

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

# शालेय शिक्षण व क्रीडा विभाग




**क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई उपनगर**

**जिल्हा क्रीडा परिषद, मुंबई उपनगर**

## मार्गदर्शिका

## २०१९-२०२०



आवाहन............

सध्याच्या धावपळीच्या व धकाधकीच्या युगात खेळाद्वारे सुदृढता हा मुलमंत्र सर्वांसाठी उपयुक्त ठरणारा आहे. त्याचमुळे सुदृढ शरीरात निरोगी मनाचा निवास असे म्हंटले जाते. राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रात राज्याची व देशाची मान उंचावणारा सध्याचा काळ आहे.खेळाडू आधुनिक तंत्रज्ञानाचा व जागतिक स्तरावर बदलांचा मागोवा घेत वैयक्तीक व सांघिक खेळातील कामगिरी उंचावत आहे व त्याचमुळे देश आज आंतरराष्ट्रीय स्तरावर सामोरे जाण्यासाठी सक्षम होत आहे.

क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार,जोपासना आणि प्रतिभावंत खेळाडू निर्मितीसाठी राज्यात विविध राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन केले जात आहे. राज्याचे क्रीडा धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य ठरले आहे. तसेच शासकीय /निमशासकीय नोक-यांमध्ये ५ टक्के आरक्षण , आंतरराष्ट्रीय स्तरावरील अत्युच्च कामगिरीसाठी खेळाडूंना थेट नियुक्ती व रोख रक्कमेची भरघोस पारितोषिके,इत्यादी बाबींअन्वये शासन क्रीडा संस्कृती व परंपरेची जपणुक करीत आहे.

सन २०१९-२० मध्ये शालेय,महिला क्रीडा स्पर्धांचा शुभारंभ करताना व स्पर्धा आयोजनासाठीची ही मार्गदर्शनपर पुस्तिका आपल्या हाती देताना मला मनस्वी आनंद होत आहे.

मुंबई उपनगर जिल्हयातील सर्व शाळा, कनिष्ठ महाविदयालये, क्रीडा संघटना,क्रीडा मार्गदर्शक, क्रीडा कार्यकर्ते,खेळाडू यांनी या स्पर्धांमध्ये मोठया संख्येने सहभागी होऊन स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करावे, असे मी आपणास आवाहन करीत आहे.

मागील वर्षी आपण सर्वांनी या स्पर्धांमध्ये सहभागी होऊन स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले आहे.याबददल जिल्हा क्रीडा परिषद,मुंबई उपनगर यांच्या वतीने मी आपणास धन्यवाद देतो.

आपणा सर्वाना सन २०१९-२० वर्षाच्या सर्व क्रीडा व युवक कल्याण उपक्रमांसाठी हार्दिक शुभेच्छा...!!

( मिलिंद बोरीकर )
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा क्रीडा परिषद,मुंबई उपनगर



मनोगत............

क्रीडा विश्वात मुंबई उपनगर जिल्हयातील खेळाडूंनी नेहमीच चमकदार कामगिरी केलेली आहे.विविध राज्य,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धामध्ये मुंबई उपनगर जिल्हयातील खेळाडू सहभागी होऊन प्राविण्य प्राप्त करीत असतात.ही अत्यंत आनंदाची व गौरवाची बाब आहे.

राज्य व राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात बॅडमिंटन, फुटबॉल,जलतरण,मैदानी,कबड्डी स्पर्धा या खेळांमध्ये मुंबई उपनगर जिल्हयातील खेळाडूंची संख्या राज्यात सर्वाधिक आहे.

आजचा विदयार्थी हा देशाचा सक्षम नागरिक होण्याबरोबरच त्याच्या सर्वांगिण व्यक्तीमत्व विकासाकरिता क्रीडा व खेळ यांचा सहभाग जीवनात अत्यंत महत्वाचा आहे.विदयार्थ्यांनी आपल्या क्रीडा जीवनाची सुरूवात शालेय क्रीडा स्पर्धांपासून करावी.शारीरिक क्षमता,निर्णय क्षमता,समन्वय ही कौशल्ये क्रीडांगणावरील प्रत्यक्ष सहभागाशिवाय खेळाडूच्या अंगी निर्माण होणार नाही.

सन २०१९-२० या वर्षासाठी शालेय क्रीडा क्रीडा स्पर्धांचे आयोजन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,मुंबई उपनगर यांच्या माध्यमातून होत आहे.मुंबई उपनगर जिल्हयातील सर्व शाळा, कनिष्ठ महाविदयालये,क्रीडा संघटना,क्रीडा मार्गदर्शक,क्रीडा कार्यकर्ते,खेळाडू यांनी या स्पर्धामध्ये मोठया संख्येने सहभागी होऊन स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करावे,असे मी आपणास आवाहन करीत आहे.

मागील वर्षी आपण सर्वांनी या स्पर्धामध्ये सहभागी होऊन स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले आहे.याबददल जिल्हा क्रीडा परिषद,मुंबई उपनगर यांच्या वतीने मी आपणास धन्यवाद देते.

आपणा सर्वांना सन २०१९-२० वर्षाच्या सर्व क्रीडा उपक्रमांसाठी हार्दिक शुभेच्छा...!!

( सुवर्णा बारटक्के )
जिल्हा क्रीडा अधिकारी तथा
सदस्य सचिव,जिल्हा क्रीडा परिषद,मुंबई उपनगर

**महाराष्ट्र शासन**
**जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,मुंबई उपनगर.**
शासकीय शारिरीक शिक्षण महाविद्यालय खालील परिसर, संभाजी नगर समोर ,आकुर्ली रोड, कांदिवली(पूर्व), मुंबई -१०१
**Email-IDdsomumbaisub@gmail.com दूरध्वनी क्रमांक: ०२२-२८८७११०५ dsomumbaisub.blogspot.com**

.......................................................................................................................................

**जा. क्र.जिक्रीअ/क्रीस्पआ /का-७/२०१९-२०/४००** **दिनांक-२०/०६/२०१९**

**प्रति,**
**प्राचार्य/मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका**
**सर्व माध्यमिक / प्राथमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय**

**विषय :- विविध शालेय क्रीडा स्पर्धा आयोजन २०१९-२०**
**संदर्भ :- शासन निर्णय क्र.राक्रीधो-२०१२/प्र.क्र.१८२/क्रीयुसे-२,दि.२४ डिसेंबर २०१४**

**दरवर्षी प्रमाणे सन २०१९-२० या वर्षात देखील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत शालेय, क्रीडा स्पर्धांचे आयोजन विविध स्तरावर करण्यात येणार आहे. या सर्व स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी आपल्या संस्थेस व सर्व विद्यार्थ्यांना हार्दिक शुभेच्छा...**

**मुंबई उपनगर जिल्ह्याने शालेय क्रीडा स्पर्धेच्या बाबतीत ऑनलाईन नोंदणी व वेबसाईटचा वापर सुरू करून संपुर्ण राज्यसमोर अत्यंत नाविन्यपुर्ण असे उदाहरण ठेवले आहे. मुंबई उपनगर जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थांनी दिलेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे हे काम शक्य झालेले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून क्रीडा क्षेत्रास अधिक सुलभ करण्याकरीता हे कार्यालय प्रयत्नरत आहे. या प्रयत्नांना अशाच सकारात्मक प्रतिसादाची भविष्यातही अपेक्षा आहे.**

**राज्यशासनाने क्रीडा धोरणाच्या माध्यमातून खेळाडूंकरीता अनेक योजना राबविण्यास सुरूवात केलेली आहे. या योजनांचा पुरेपूर लाभ आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांना आपल्या माध्यमातूनच प्राप्त होणार आहे. सवलत गुण, शासकीय नोकरीत ५ टक्के आरक्षण, थेट नियुक्ती, गौरव पुरस्कार, शिष्यवृत्ती व रोख पुरस्कार अशा अनेकविध योजनांच्या माध्यमातून शासन खेळाडूंना मदत करण्यास तयार आहे.**

**सन २०१८-१९ या वर्षात एकुण ४९ क्रीडा प्रकारात ७६८०९ विद्यार्थ्यांनी या कार्यालयामार्फत आयोजित विविध क्रीडा स्पर्धांमध्ये आपला सहभाग नोंदविला आहे. या वर्षीदेखील जास्तीत जास्त संख्येने या क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होऊन विद्यार्थ्यांना या संधीचा लाभ घेण्यासाठी सहकार्य करावे अशी विनंती आहे.**

**( सुवर्णा बारटक्के)**
**जिल्हा क्रीडा अधिकारी**
**तथा सचिव**
**जिल्हा क्रीडा परिषद, मुंबई उपनगर**

प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादर-
१. मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा क्रीडा परिषद,मुंबई उपनगर
२. मा.आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
3. मा.विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग, मुंबई
४. मा.शिक्षण निरीक्षक,उत्तर विभाग व दक्षिण विभाग, जि. मुंबई उपनगर.
५. मा.शिक्षणाधिकारी,(महानगरपालिका ),मुंबई उपनगर
६. मा.सदस्य(सर्व),जिल्हा क्रीडा परिषद,मुंबई उपनगर
७. मा.अध्यक्ष/सचिव(सर्व),जिल्हा एकविध क्रीडा संघटना, मुंबई उपनगर जिल्हा

# स्पर्धेसाठी महत्वाच्या सूचना :- शालेय, क्रीडा स्पर्धासाठी लागू

**वेबसाईट** - www.mumbaidivsports.com **ब्लॉग** - www.dsomumbaisub.blogspot.com

१. सन २०१९-२० या वर्षात आयोजित करण्यात येणा-या सर्व क्रीडा स्पर्धांची प्राथमिक नोंदणीपासून सर्व बाबी ऑनलाईन करण्यात येणार या बाबातचे प्रशिक्षण सभेसाठी उपस्थित असलेल्या प्रत्येक शिक्षकास देण्यात आलेले आहे. या वापरासाठी आपल्या शाळेचा यू-डायस डाटामधील कोड नंबर हा युजर आय डी व प्राथमिक पासवर्ड म्हणून वापरण्यात येणार आहे. सदरचा पासवर्ड नंतर आपल्या सोयीप्रमाणे बदलण्यात यावा व लक्षात ठेवावा.

२. प्रत्येक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयासाठी ऑनलाईन प्राथमिक प्रवेशिका दिनांक ३० जुलै २०१९ ते ०८ ऑगस्ट २०१९ या कालावधीत नोंद करून प्रवेश निश्चित करावयाचा आहे. त्यानंतर मात्र कोणत्याही परिस्थितीत प्राथमिक प्रवेशिका वा खेळांच्या प्रवेश नोंद करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

३. वजन गट स्पर्धामध्ये भाग घेताना सर्व शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी खेळाडूचे वजन करूनच त्या वजन गटात खेळाडूंचे नाव नोंदणी करावी. स्पर्धेदरम्यान वजन कमी/ जास्त झाल्यास खेळाडूना इतर वजन गटात खेळता येणार नाही याची नोंद प्रत्येक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी घ्यावी.

४. खेळाडूंचा वयोगटा संबंधीचा तक्ता:-दिनांक ०१/०१/२०२० रोजी म्हणजे ३१/१२/२०१९ पर्यंत मोजावे.

| अ.क्र. | स्पर्धा प्रकार | वयोगट | इयत्ता | जन्मतारीख |
|---|---|---|---|---|
| १ | सुब्रतो मुखर्जी कप फुटबॉल स्पर्धा | १४ वर्षे मुले | वर्गाची अट नाही | ०१/०१/२००६.रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा |
| २ | सुब्रतो मुखर्जी कप फुटबॉल स्पर्धा | १७ वर्षे मुले/मुली | वर्गाची अट नाही | दि.०१/०१/२००३ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा |
| ३ | शालेय क्रीडा स्पर्धा (मुले व मुली) | १४वर्षाखालील | इयत्ता ९ वी पर्यंत शिकत असलेले | दि.०१/०१/२००६ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा. |
| ४ | शालेय क्रीडा स्पर्धा (मुले व मुली) | १७ वर्षाखालील | इयत्ता ११ वी पर्यंत शिकत असलेले | दि.०१/०१/२००३ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा. |
| ५ | शालेय क्रीडा स्पर्धा (मुले व मुली) | १९ वर्षाखालील | इयत्ता १२ वीपर्यंत शिकत असलेले | दि.०१/०१/२००१ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा. |
| ६ | सब ज्युनि. नेहरू हॉकी स्पर्धा (मुले) | १५ वर्षाखालील | वर्गाची अट नाही | दि.०१/११/२००४ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा. |
| ७ | ज्यूनि. नेहरू हॉकी स्पर्धा( मुले व मुली ) | १७ वर्षाखालील | वर्गाची अट नाही | दि.०१/११/२००२ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा. |

५. फी बाबत :- नोंदणी शुल्क व प्रवेश फ़ी विद्यार्थी संख्येनुसार प्राथमिक /माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी भरावयाचे शुल्क खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विद्यार्थी संख्या | भरावयाचे संलग्नता शुल्क (रुपये) | क्रिडा निधी (रुपये) |
|---|---|---|---|
| १. | १ ते ५०० | १००/- | २५०/-/- |
| २. | ५०१ ते १००० | १५०/- | ४५०/- |
| ३. | १००१ ते १५०० | २००/- | ५५०/- |
| ४. | १५०१ ते २००० | २५०/- | ६००/- |
| ५. | २००१ ते २५०० | ३००/- | ७५०/- |
| ६. | २५०० पेक्षा जास्त विद्यार्थी | ३५०/- | १०००/- |

**i)** प्रत्येक वयोगटातील प्रत्येक सांघिक खेळासाठी प्रति संघ रु. ५०/- (रु.पन्नास ) मुला-मुलींसाठी वेगवेगळे

**ii)** प्रत्येक वयोगटातील वैयक्तिक क्रीडा प्रकारातील प्रत्येक बाबीसाठी खेळासाठी रू. **२५**/-( रु. पंचवीस) मुला-मुलींसाठी वेगवेगळे

तसेच खालील काही विशेष खेळबाबींसाठी पुढील प्रमाणे फी आकारण्यात येईल.

**१. क्रिकेट - रू. ४००/-**
**२. फुटबॉल (सर्व) - रू.४००/-**
**३. बॅडमिंटन - रू. २००/-**
**४. हॉकी (सर्व) - रू.४००/-**
**५. लॉनटेनिस (प्रति खेळाडू) - रू. १००/-**
**६. बास्केटबॉल (प्रति संघ)- रू.२००/-**
**७. रायफल शुटींग (नेमबाजी) (प्रति खेळाडू) - रू.१००/-**
**८. टेबल टेनिस (प्रति संघ)- रू.१५०/-**

६. प्राथमिक प्रवेशिकेची ऑनलॉईन नोंद झाल्यानंतर खेळाडूंची नोंदणी ओळखपत्रकरून संघ / खेळाडूंचे ऑनलाईन प्रवेश अर्ज प्रत्येक स्पर्धेच्या प्रथम दिवसाच्या पाच दिवस आधी नोंदि करणे आवश्यक आहे. त्यावर शाळेच्या मुख्याध्यापक अथवा महाविद्यालयाच्या प्राचार्याचा सही शिक्का असणे अनिवार्य आहे. त्यानंतर सदरचा प्रवेश आपोआप बंद होईल. अशा प्रकारे प्रवेश बंद झाल्यानंतर संघाची / खेळाडूची प्रवेशिका ऑनलाईन स्विकारली जाणार नाही. अशा खेळाडूंना कोणत्याही सबबीवर स्पर्धेत सहभागी करून घेण्यात येणार नाही. तसेच फक्त ऑनलाईन ओळखपत्रावरही सहभागी करून घेतले जाणार नाही . ऑनलाईन प्रवेश अर्ज आवश्यक राहील. याची सर्व क्रीडा शिक्षकांनी नोंद घेवून सहकार्य करावे. मॅन्यूअली तयार करण्यात आलेल्या प्रवेशिका / ओळखपत्रे असलेल्या खेळाडूंना स्पर्धेत सहभागी करून घेण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

७. सर्व संघानी व खेळाडुंनी स्पर्धेच्या दिलेल्या वेळेच्या ३० मिनिटे आधि उपस्थिती द्यावी.दिलेल्या वेळेत संघ उपस्थित न झाल्यास दिलेल्या वेळेच्या १० मिनिटे अधिक संघाची वाट बघितली जाईल. जर संघ त्या अधिक वेळेतही हजर झाला नाही तर विरुद्ध संघास विजयी घोषित करुन पुढे चाल देण्यात येईल. याची नोंद सर्व क्रीडा शिक्षकांनी , मुख्याध्यापकांनी घ्यावी.

८. शालेय क्रीडा स्पर्धामधील प्रत्येक खेळातील व प्रत्येक वयोगटातील प्रत्येक स्तरावरील स्पर्धा बाद पध्दतीने घेण्यात येतील.

९. शालेय व इतर स्पर्धांमध्ये प्रत्येक खेळाडुने स्वत:च्या जबाबदारीने सहभाग घ्यावा स्पर्धेदरम्यान कोणत्याही कारणास्तव खेळाडुस कोणतीही दुखापत/इजा झाल्यास अथवा दुर्घटना झाल्यास त्यास संयोजन समिती जबाबदार राहणार नाही व कोणत्याही प्रकारचा खर्च संयोजन समितीकडून करण्यात येणार नाही.

१०. स्पर्धेत सहभागी होताना त्या त्या खेळाच्या एकविध संघटनेने निश्चित केलेला गणवेश (स्पोर्टस किट) असणे अनिवार्य आहे. गणवेश नसेल तर स्पर्धेत सहभाग दिला जाणार नाही.

११. जिल्हास्तरापासून पुढील स्तरावर सहभागी होत असताना पात्रता प्रमाणपत्रावर जिल्हा क्रीडा अधिकारी यांची प्रतिस्वाक्षरी असणे बंधनकारक आहे.

१२. तक्रार निवारण :-

अ) स्पर्धेच्यावेळी खेळाडूंबाबत तक्रार करावयाची असल्यास ती लेखी स्वरूपात संघ व्यवस्थापक/ मार्गदर्शक/ संघनायक यांनी सामना संपण्यापूर्वी अथवा सामना संपल्यानंतर ३० मिनीटांच्या आत तक्रार शुल्क रू. १०००/-(रूपये एक हजार फ़क्त) भरून संयोजकांकडे सादर करावे.

आ) तक्रार नोंदविणा-या व्यक्तीने तक्रार नोंदविल्यानंतर तक्रारीबाबतचे पुरावे ३० मिनीटाच्या आत सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा तक्रार फ़ेटाळण्यात येईल.

इ) पंच व तांत्रिक सदस्यांनी दिलेल्या निर्णयाविरुध्द कोणतिही तक्रार नोंदवून घेतली जाणार नाही.

ई) संयोजक प्राप्त तक्रारीचा निर्णय लेखी स्वरूपात देतील.

१३. तक्रार निवारण समिती - तक्रार निवारण समितीचे स्वरुप हे त्रिसदस्यीय राहील.

अ) उपसंचालक/ जिल्हा क्रीडा अधिकारी / तालुका क्रीडा अधिकारी हे अनुक्रमे विभाग / जिल्हा / तालुकास्तरावर अध्यक्ष म्हणून काम पाहतील.

आ) संबधित एकविध खेळाच्या संघटनांचे प्रतिनिधी.

इ) क्रीडा मार्गदर्शक / क्रीडा अधिकारी.

ई) संबंधित खेळाचे पुरस्कार्थी खेळाडु / तज्ञ अनुभवी क्रीडा शिक्षक.

उ) संबंधित खेळाच्या आयोजन समितीचे प्रमुख.

१४. स्पर्धा कार्यक्रमातील दिनांक, वेळ, व जागेसंबंधी काही कारणास्तव बदल करण्याचा प्रसंग आल्यास ,बदल करण्याचे अधिकार जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई उपनगर यांनी राखुन ठेवले आहेत.

- **संचालनालयाकडुन संचालनालय स्तरावर यातील काही खेळ कमी झाल्यास वा काही खेळांचा नविन समावेश झाल्यास आपणास कळविण्यात येईल .**
- **याशिवाय काही बदल/सुचना असल्यास वेळोवेळी त्यानुसार ब्लॉगवर (dsomumbaisub.blogspot.com) मोबाईल ॲप (MUMBAI D SPORTS) तसेच वेबसाईटवर (www.mumbaidivsports.com) प्रसिध्दी देण्यात येईल.**

## जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर येथील अधिकारी / कर्मचारी यादी

| अ.क्र. | नाव | पदनाम | संपर्क क्र. |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती. सुवर्णा बारटक्के | जिल्हा क्रीडा अधिकारी | ०२२-२८८७११०५ |
| २ | श्रीमती. वर्षा साळवी | तालुका क्रीडा अधिकारी (अंधेरी, बोरीवली) | ०९८२१४१५९१६ |
| ३ | श्री. अमोल दंडवते | क्रीडा अधिकारी तसेच अतिरीक्त कार्यभार तालुका क्रीडा अधिकारी (कुर्ला) | ०९४२३६१८०७० |
| ४ | श्रीमती. जयश्री देवकर | क्रीडा अधिकारी | ०९६०४७५२५६४ |
| ५ | श्री. वासुदेव थिटे | क्रीडा मार्गदर्शक | ०८४२२९१०१३७ |
| ६ | श्री. संजोग ढोले | क्रीडा मार्गदर्शक | ०९८५०४१९७०४ |
| ७ | श्रीमती. रश्मी आंबेडकर | क्रीडा मार्गदर्शक | ०९५११७८८८१८ |

# शालेय क्रीडा स्पर्धासाठी खेळ,वयोगट व खेळाडू संख्या दर्शविणारा तक्ता सन २०१९-२०

| अ.क्र. | खेळ | वयोगट | | संघातील खेळाडू संख्या |
|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | |
| १ | आर्चरी (इंडीयन,रीक्युर, कंपाऊड राऊंड) | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | प्रत्येकी ०४ |
| २ | अॅथलेटीक्स | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | बाबनिहाय २ खेळाडू |
| | क्रॉसकंट्री | १९ वर्षाखालील | १९ वर्षाखालील | ०६ |
| ३ | बॅडमिंटन | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | ०५ |
| ४ | बास्केटबॉल | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | १२ |
| ५ | बॉक्सींग | १४,१७,१९ वर्षाखालील | १७,१९ वर्षाखालील | प्रत्येक वजनी गटात २ खेळाडू |
| ६ | बेसबॉल | १४,१७,१९ वर्षाखालील | १४,१७,१९ वर्षाखालील | १६ |
| ७ | बॉल बॅडमिंटन | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | १० |
| ८ | बुध्दीबळ | १४,१७,१९ वर्षाखालील | १४,१७,१९ वर्षाखालील | ५ |
| ९ | क्रिकेट | १४,१७,१९ वर्षाखालील | १७,१९ वर्षाखालील | १६ |
| १० | सायकलींग,रोडरेस | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | ६ |
| ११ | शुटींगबॉल | १९ वर्षा खालील | १९ वर्षा खालील | १० |
| १२ | स्क्वॅश | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | ४ |
| १३ | कॅरम | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | ५ |
| १४ | डॉजबॉल | १७,१९ वर्षा खालील | १७,१९ वर्षा खालील | १० |
| १५ | फुटबॉल | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | १८ |
| १६ | सुब्रतो कप फुटबॉल | १४,१७ वर्षा खालील | १७ वर्षा खालील | १६ |
| १७ | तलवारबाजी | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | संघ ४, वैयक्तीक २ |
| १८ | जिम्नॅस्टिक्स -आर्टीस्टीक | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | ७ मुले व ७ मुली |
| | रिदमिक जिम्नॅस्टिक्स | -- | १४,१७,१९ वर्षा खालील | प्रत्येक वयोगटात ४ खेळाडू |
| | अॅक्रोबॅटीक्स | १९ वर्षाखालील | १९ वर्षाखालील | ७ मुले व ६ मुली |
| १९ | हॅन्डबॉल | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | १६ |
| २० | कबडडी | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | १२ |
| २१ | खो - खो | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | १२ |
| २२ | किक बॉक्सींग | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | प्रत्येक वजनी गटात २ खेळाडू |
| २३ | लॉन टेनिस | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | ५ |
| २४ | मल्लखांब | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | ४ |

| अ.क्र. | खेळ | वयोगट | | संघातील खेळाडू संख्या |
|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | |
| २५ | नेटबॉल | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | १२ |
| २६ | हॉकी | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | १८ |
| २७ | नेहरु कप हॉकी | १५,१७ वर्षाखालील | १७ वर्षाखालील | १६ |
| २८ | रोलर स्केटींग (क्वाड व इनलाईन) | ११,१४,१७,१९ वर्षाखालील | ११,१४,१७,१९वर्षाखालील | क्वाड व इनलाईन प्रत्येकी ३ |
| | रोलर हॉकी | १९ वर्षाआतील | -- | १२ |
| २९ | रोल बॉल | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | १२ |
| ३० | रायफल शुटींग | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | ४ |
| ३१ | जलतरण व डायव्हींग | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | बाबनिहाय २ खेळाडू |
| | वॉटरपोलो | १९ वर्षाआतील | -- | १३ |
| ३२ | सॉफ्टबॉल | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | १६ |
| ३३ | सिकई मार्शल आर्ट | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | प्रत्येक वजनी गटात २ खेळाडू |
| ३४ | टेबल - टेनिस | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | ५ |
| ३५ | तायक्वांदो | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | प्रत्येक वजनी गटात २ खेळाडू |
| ३६ | थ्रोबॉल | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | १२ |
| ३७ | व्हॉलीबॉल | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | १२ |
| ३८ | कुस्ती ( फ्री स्टाईल ) | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | प्रत्येक वजनी गटात २ खेळाडू |
| | कुस्ती (ग्रिको रोमन) | १७,१९ वर्षा खालील | -- | प्रत्येक वजनी गटात २ खेळाडू |
| ३९ | वेटलिफटीग | १७,१९ वर्षा खालील | १७,१९ वर्षा खालील | प्रत्येक वजनी गटात २ खेळाडू |
| ४० | योगासन | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | ७ |
| ४१ | कराटे | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | प्रत्येक वजनी गटात २ खेळाडू |
| ४२ | वुशु | १७,१९ वर्षा खालील | १७,१९ वर्षा खालील | प्रत्येक वजनी गटात २ खेळाडू |
| ४३ | ज्युदो | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | प्रत्येक वजनी गटात २ खेळाडू |
| ४४ | रग्बी | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | १२ |
| ४५ | मॉडर्न पेंटँथलॉन | १७,१९ वर्षा खालील | १७,१९ वर्षा खालील | नंतर कळवण्यात येईल |
| ४६ | टेनिक्वॉईट | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | नंतर कळवण्यात येईल |
| ४७ | सेपक टकरा | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | नंतर कळवण्यात येईल |
| ४८ | सॉफ्ट टेनिस | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | नंतर कळवण्यात येईल |
| ४९ | आट्यापाट्या | १४,१७,१९ वर्षा खालील | १४,१७,१९ वर्षा खालील | नंतर कळवण्यात येईल |

# जलतरण बाबींचा तक्ता

| गट | मुले | मुली |
|---|---|---|
| १४ वर्षे | फ्रीस्टाईल - ५०,१००,२००,४०० मी.<br>बॅकस्ट्रोक - ५०,१००,२०० मी.<br>ब्रेस्ट स्ट्रोक - ५०,१००,२०० मी.<br>बटरफ़्लाय - ५०,१००,२०० मी.<br>वयक्तिक मिडले -२०० मी.<br>रिले - ४ बाय १०० मी., ४ बाय १०० मी. मिडले<br>डायव्हींग - १ व ३ स्प्रिंग बोर्ड व हायबोर्ड | फ्रीस्टाईल - ५०,१००,२००,४०० मी.<br>बॅकस्ट्रोक - ५०,१००,२०० मी.<br>ब्रेस्ट स्ट्रोक - ५०,१००,२०० मी.<br>बटरफ़्लाय - ५०,१००,२०० मी.<br>वयक्तिक मिडले -२००, मी.<br>रिले - ४ बाय १०० मी., ४ बाय १०० मी. मिडले<br>डायव्हींग - १ व ३ स्प्रिंग बोर्ड व हायबोर्ड |
| १७ वर्षे | फ्रीस्टाईल - ५०,१००,२००,४००,८०० मी.<br>बॅकस्ट्रोक - ५०,१००,२०० मी.<br>ब्रेस्ट स्ट्रोक - ५०,१००,२०० मी.<br>बटरफ़्लाय - ५०,१००,२०० मी.<br>वयक्तिक मिडले -२००,४०० मी.<br>रिले - ४ बाय १०० मी., ४ बाय १०० मी. मिडले<br>डायव्हींग - १ व ३ स्प्रिंग बोर्ड व हायबोर्ड | फ्रीस्टाईल - ५०,१००,२००,४००, मी.<br>बॅकस्ट्रोक - ५०,१००,२०० मी.<br>ब्रेस्ट स्ट्रोक - ५०,१००,२०० मी.<br>बटरफ़्लाय - ५०,१००,२०० मी.<br>वयक्तिक मिडले -२००,४०० मी.<br>रिले - ४ बाय १०० मी., ४ बाय १०० मी. मिडले<br>डायव्हींग - १ व ३ स्प्रिंग बोर्ड व हायबोर्ड |
| १९ वर्षे | फ्रीस्टाईल - ५०,१००,२००,४००,१५०० मी.<br>बॅकस्ट्रोक - ५०,१००,२०० मी.<br>ब्रेस्ट स्ट्रोक - ५०,१००,२०० मी.<br>बटरफ़्लाय - ५०,१००,२०० मी.<br>वयक्तिक मिडले -२००,४०० मी.<br>रिले - ४ बाय १०० मी., ४ बाय १०० मी. मिडले<br>डायव्हींग - १ व ३ स्प्रिंग बोर्ड व हायबोर्ड | फ्रीस्टाईल - ५०,१००,२००,४००,८०० मी.<br>बॅकस्ट्रोक - ५०,१००,२०० मी.<br>ब्रेस्ट स्ट्रोक - ५०,१००,२०० मी.<br>बटरफ़्लाय - ५०,१००,२०० मी.<br>वयक्तिक मिडले -२००,४०० मी.<br>रिले - ४ बाय १०० मी., ४ बाय १०० मी. मिडले<br>डायव्हींग - १ व ३ स्प्रिंग बोर्ड व हायबोर्ड |

# ज्युदो

| अ.क्र | १४ वर्षे | | १७ वर्षे | | १९ वर्षे | |
|---|---|---|---|---|---|---|
| | वजन | | | | | |
| | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली |
| १ | -२५ कि.ग्रॅ. | - २३ कि.ग्रॅ | - ४० कि.ग्रॅ | - ३६ कि.ग्रॅ | - ४० कि.ग्रॅ | - ३६ कि.ग्रॅ |
| २ | - ३० | - २७ | - ४५ | - ४० | - ४५ | - ४० |
| ३ | - ३५ | - ३२ | - ५० | - ४४ | - ५० | - ४४ |
| ४ | - ४० | - ३६ | - ५५ | - ४८ | - ५५ | - ४८ |
| ५ | - ४५ | - ४० | - ६० | - ५२ | - ६० | - ५२ |
| ६ | - ५० | - ४४ | - ६६ | - ५७ | - ६६ | - ५७ |
| ७ | + ५० | + ४४ | - ७३ | - ६३ | - ७३ | - ६३ |
| ८ | -- | -- | - ८१ | - ७० | - ८१ | - ७० |
| ९ | -- | -- | - ९० | + ७० | - ९० | + ७० |
| १० | -- | -- | + ९० | -- | + ९० | -- |

# तायक्वांदो

| अ.क्र | १४ वर्षे | | १७ वर्षे | | १९ वर्षे | |
|---|---|---|---|---|---|---|
| | वजन | | | | | |
| | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली |
| १ | - १८ कि.ग्रॅ | - १६ कि.ग्रॅ | - ३५ कि.ग्रॅ | - ३२ कि.ग्रॅ | ४१-४५ कि.ग्रॅ | - ४० कि.ग्रॅ |
| २ | १८ - २१ | १६ - १८ | ३५ - ३८ | ३२ - ३५ | ४५ - ४८ | ४० - ४२ |
| ३ | २१ - २३ | १८ - २० | ३८ - ४१ | ३५ - ३८ | ४८ - ५१ | ४२ - ४४ |
| ४ | २३ - २५ | २० - २२ | ४१ - ४५ | ३८ - ४२ | ५१ - ५५ | ४४ - ४६ |
| ५ | २५ - २७ | २२ - २४ | ४५ - ४८ | ४२ - ४४ | ५५ - ५९ | ४६ - ४९ |
| ६ | २७ - २९ | २४ - २६ | ४८ - ५१ | ४४ - ४६ | ५९ - ६३ | ४९ - ५२ |
| ७ | २९ - ३२ | २६ - २९ | ५१ - ५५ | ४६ - ४९ | ६३ - ६८ | ५२ - ५५ |
| ८ | ३२ - ३५ | २९ - ३२ | ५५ - ५९ | ४९ - ५२ | ६८ - ७३ | ५५ - ५९ |
| ९ | ३५ - ३८ | ३२ - ३५ | ५९ - ६३ | ५२ - ५५ | ७३ - ७८ | ५९ - ६३ |
| १० | ३८ - ४१ | ३५ - ३८ | ६३ - ६८ | ५५ - ५९ | + ७८ | ६३ - ६८ |
| ११ | + ४१ | + ३८ | ६८ - ७३ | ५९ - ६३ | -- | + ६८ |
| १२ | -- | -- | ७३ - ७८ | ६३ - ६८ | -- | -- |
| १३ | --- | -- | + ७८ | + ६८ | -- | -- |

# कुस्ती ( फ्री स्टाईल व ग्रीकोरोमन)

| अ.क्र | १४ वर्षे | | १७ वर्षे | | १९ वर्षे | | १९ वर्षे (ग्रीकोरोमन) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | वजन | | | | | | |
| | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले |
| १ | ३५ कि.ग्रॅ | ३० कि.ग्रॅ | ४१ ते ४५ कि.ग्रॅ | ३६ ते ४० कि.ग्रॅ | ५७ कि.ग्रॅ | ५० कि.ग्रॅ | ५५ कि.ग्रॅ |
| २ | ३८ | ३३ | ४८ | ४३ | ६१ | ५३ | ६० |
| ३ | ४१ | ३६ | ५१ | ४६ | ६५ | ५५ | ६३ |
| ४ | ४४ | ३९ | ५५ | ४९ | ७० | ५७ | ६७ |
| ५ | ४८ | ४२ | ६० | ५३ | ७४ | ५९ | ७२ |
| ६ | ५२ | ४६ | ६५ | ५७ | ७९ | ६२ | ७७ |
| ७ | ५७ | ५० | ७१ | ६१ | ८६ | ६५ | ८२ |
| ८ | ६२ | ५४ | ८० | ६५ | ९२ | ६८ | ८७ |
| ९ | ६८ | ५८ | ९२ | ६९ | ९७ | ७२ | ९७ |
| १० | ७५ | ६२ | ११० | ७३ | १२५ | ७६ | १३० |

# कब्बड्डी

| अ.क्र | वयोगट | क्रीडांगणाचे मोजमाप | वजन | संघ खेळाडु संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | १४ वर्षे मुले | ११ बाय ०८ स्क्वे.मी | ५१ कि.ग्रॅ. खालील | १२ |
| २ | १४ वर्षे मुली | ११ बाय ०८ स्क्वे.मी | ४८ कि.ग्रॅ. खालील | १२ |
| ३ | १७ वर्षे मुले | १२ बाय ०८ स्क्वे.मी | ५५ कि.ग्रॅ. खालील | १२ |
| ४ | १७ वर्षे मुली | १२ बाय ०८ स्क्वे.मी | ५५ कि.ग्रॅ. खालील | १२ |
| ५ | १९ वर्षे मुले | १३ बाय १० स्क्वे.मी | ७० कि.ग्रॅ. खालील | १२ |
| ६ | १९ वर्षे मुली | १२ बाय ०८ स्क्वे.मी | ६५ कि.ग्रॅ. खालील | १२ |

# वुशू

| अ.क्र | १७ वर्षे | | १९ वर्षे | |
|---|---|---|---|---|
| | वजन | | | |
| | मुले | मुली | मुले | मुली |
| १ | - ४० | - ३६ | - ४० | - ३६ |
| २ | - ४५ | - ४० | - ४५ | - ४० |
| ३ | - ४८ | - ४५ | - ४८ | - ४५ |
| ४ | - ५२ | - ४८ | - ५२ | - ४८ |
| ५ | - ५६ | - ५२ | - ५६ | - ५२ |
| ६ | - ६० | - ५६ | - ६० | - ५६ |
| ७ | - ६५ | - ६० | - ६५ | - ६० |
| ८ | - ७० | - ६५ | - ७० | - ६५ |
| ९ | - ७५ | - ७० | - ७५ | + ६५ |
| १० | - ८० | -- | - ८० | -- |
| ११ | - ८५ | -- | - ८५ | -- |

# सिकई मार्शल आर्ट

| अ. क्र | १४ वर्षे | | १७ वर्षे | | १९ वर्षे | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली |
| १ | - २५ कि.ग्रॅ | - २३ कि.ग्रॅ | - ४० कि.ग्रॅ | - ३६ कि.ग्रॅ | - ४६ कि.ग्रॅ | - ४२ कि.ग्रॅ |
| २ | - २९ | - २७ | - ४४ | - ४० | - ५० | - ४६ |
| ३ | - ३३ | - ३१ | - ४८ | - ४४ | - ५४ | - ५० |
| ४ | - ३७ | - ३५ | - ५२ | - ४८ | - ५८ | - ५४ |
| ५ | - ४१ | - ३९ | - ५६ | - ५२ | - ६२ | - ५८ |
| ६ | - ४५ | - ४१ | - ६० | - ५६ | - ६६ | - ६२ |
| ७ | ४५ वरील | ४१ वरील | ६० वरील | ५६ वरील | ६६ वरील | ६२ वरील |
| ८ | K-१ | K-१ | K-१ | K-१ | K-१ | K-१ |
| ९ | -- | -- | K-२ | K-२ | K-२ | K-२ |
| १० | ASI | ASI | ASI | ASI | ASI | ASI |

## बॉक्सिंग

| अ.क्र | १४ वर्षे | | १७ वर्षे | | १९ वर्षे | |
|---|---|---|---|---|---|---|
| | वजन | | | | | |
| | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली |
| १ | २८ - ३० | -- | - ४६ | - ४२ | - ४६ | - ४५ |
| २ | ३० - ३२ | -- | ४६ - ४८ | ४२ - ४४ | ४६ - ४९ | ४५ - ४८ |
| ३ | ३२ - ३४ | -- | ४८ - ५० | ४४ - ४६ | ४९ - ५२ | ४८ - ५१ |
| ४ | ३४ - ३६ | -- | ५० - ५२ | ४६ - ४८ | ५२ - ५६ | ५१ - ५४ |
| ५ | ३६ - ३८ | -- | ५२ - ५४ | ४८ - ५० | ५६ - ६० | ५४ - ५७ |
| ६ | ३८ - ४० | -- | ५४ - ५७ | ५० - ५२ | ६० - ६४ | ५७ - ६० |
| ७ | ४० - ४२ | -- | ५७ - ६० | ५२ - ५४ | ६४ - ६९ | ६० - ६४ |
| ८ | ४२ - ४४ | -- | ६० - ६३ | ५४ - ५७ | ६९ - ७५ | ६४ - ६६ |
| ९ | ४४ - ४६ | -- | ६३ - ६६ | ५७ - ६० | ७५ - ८१ | ६६ - ६९ |
| १० | ४६ - ४८ | -- | ६६ - ७० | ६० - ६३ | ८१ - ९१ | ६९ - ७५ |
| ११ | ४८ - ५० | -- | ७० - ७५ | ६३ - ६६ | + ९१ | ७५ - ८० |
| १२ | -- | -- | ७५ - ८० | ६६ - ७० | -- | + ८१ |
| १३ | -- | -- | + ८० | ७० - ७५ | -- | -- |
| १४ | -- | -- | -- | ७५ - ८० | -- | -- |
| १५ | -- | -- | -- | + ८० | -- | -- |

## किक बॉक्सिंग

| अ.क्र | १४ वर्षे | | १७ वर्षे | | १९ वर्षे | |
|---|---|---|---|---|---|---|
| | वजन | | | | | |
| | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली |
| १ | - २४ कि.ग्रॅ | - २४ कि.ग्रॅ | - ३५ कि.ग्रॅ | - ३५ कि.ग्रॅ | - ४४ कि.ग्रॅ | - ४५ कि.ग्रॅ |
| २ | - २८ | - २८ | - ४० | - ४० | - ४८ | - ४८ |
| ३ | - ३२ | - ३२ | - ४५ | - ४५ | - ५२ | - ५१ |
| ४ | - ३७ | - ३७ | - ५० | - ५० | - ५६ | - ५४ |
| ५ | - ४२ | - ४२ | - ५५ | - ५५ | - ६० | - ५७ |
| ६ | - ४७ | - ४६ | - ६० | - ६० | - ६५ | - ६३ |
| ७ | - ५२ | - ५० | - ६५ | + ६० | - ७० | + ६३ |
| ८ | - ५७ | -- | - ७० | -- | - ७५ | -- |
| ९ | - ६३ | -- | - ७५ | -- | - ८० | -- |
| १० | + ६३ | -- | + ७५ | -- | + ८० | -- |

# कराटे

| अ.क्र | १४ वर्षे | | १७ वर्षे | | १९ वर्षे | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली |
| १ | -२० | -१८ | - ३५ | - ३२ | -३५ | -३२ |
| २ | -२५ | -२२ | -४० | -३६ | -४० | -३६ |
| ३ | -३० | -२४ | -४५ | -४० | -४५ | -४० |
| ४ | -३५ | -२६ | -५० | -४४ | -५० | -४४ |
| ५ | -४० | -३० | -५४ | -४८ | -५४ | -४८ |
| ६ | -४५ | -३४ | -५८ | -५२ | -५८ | -५२ |
| ७ | -५० | -३८ | -६२ | -५६ | -६२ | -५६ |
| ८ | -५५ | -४२ | -६६ | -६० | -६६ | -६० |
| ९ | -६० | -४६ | -७० | -६४ | -७० | -६४ |
| १० | +६० | -५० | -७४ | -६८ | -७४ | -६८ |
| ११ | -- | +५० | -७८ | +६८ | -७८ | +६८ |
| १२ | -- | -- | -८२ | -- | -८२ | -- |
| १३ | -- | -- | +८२ | -- | +८२ | -- |

# वेटलिफ्टिंग

| अ.क्र | १७ वर्षे | | १९ वर्षे | |
|---|---|---|---|---|
| | वजन | | | |
| | मुले | मुली | मुले | मुली |
| १ | - ४९ कि.ग्रॅ | - ४० कि.ग्रॅ | - ५५ कि.ग्रॅ | - ४५ कि.ग्रॅ |
| २ | - ५५ | - ४५ | - ६१ | - ४९ |
| ३ | - ६१ | - ४९ | - ६७ | - ५५ |
| ४ | - ६७ | - ५५ | - ७३ | - ५९ |
| ५ | - ७३ | - ५९ | - ८१ | - ६४ |
| ६ | - ८१ | - ६४ | - ८९ | - ७१ |
| ७ | - ८९ | - ७१ | - ९६ | - ७६ |
| ८ | - ९६ | - ७६ | - १०२ | - ८१ |
| ९ | - १०२ | - ८१ | + १०२ | - ८७ |
| १० | + १०२ | + ८१ | -- | + ८७ |

# मैदानी

## वैयक्तीक प्रकारची वयोगटनिहाय होणा-या स्पर्धा बाबी

**अ.मैदानी स्पर्धा - १४ वर्षे वयोगट मुले/मुली .**

१. मुले/मुली धावणे १००,२००,४००,६०० मीटर.
२. हर्डल्स ८० मी (७६.२ से.मी.उंची )
३. रिले ४ X १०० मीटर
४. उंच उडी ,लांब उडी.
५. मुले - गोळा फेक ( ४ कि .ग्रॅ.)
६. मुली - गोळा फेक ( 3 कि .ग्रॅ.)
७. थाळी फेक ( १ कि .ग्रॅ.)

**ब. मैदानी स्पर्धा - १७ वर्षे वयोगट मुले.**

१. १००,२००,४००,८००,१५००,३००० मीटर धावणे.
२. हर्डल्स ११० मी ( ०.९१४ मी.उंची )
३. हर्डल्स ४००मी ( ०.८३८.मी.उंची
४. रिले ४ X १०० मीटर
५. उंच उडी ,लांब उडी.तिहेरी उडी,बांबु उडी.
६. गोळा फेक (५ कि .ग्रॅ.)
७. थाळी फेक ( १.५ कि .ग्रॅ.)
८. भाला फेक (७०० ग्रॅम )
९. हातोडा फेक (५ कि.ग्रॅ.)
१०. ५००० मी. चालणे.

**क. मैदानी स्पर्धा - १७ वर्षे वयोगट मुली.**

१. १००,२००,४००,८००,१५००,३००० मीटर धावणे.
२. हर्डल्स १०० मी (०.७६२ मी.उंची )
३. हर्डल्स ४००मी (०.७६२ मी.उंची )
४. रिले ४ X १०० मीटर
५. उंच उडी ,लांब उडी.तिहेरी उडी,बांबु उडी.
६. गोळा फेक ( ३ कि .ग्रॅ.)
७. थाळी फेक ( १ कि .ग्रॅ.)
८. भाला फेक ( ५०० ग्रॅम )
९. हातोडा फेक ( ३ कि.ग्रॅ.)
१०. ३००० मी.चालणे.

**ड. मैदानी स्पर्धा - १९ वर्षे वयोगट मुले.**

१. १००,२००,४००,८००,१५००,५००० मीटर धावणे
२. हर्डल्स ११० मी ( ०.९१४ मी.उंची )
३. हर्डल्स ४०० मी. ( ०.८३८ मी.उंची )
४. रिले ४ X १०० मीटर, ४ X ४०० मीटर
५. उंच उडी , लांब उडी.तिहेरी उडी,बांबु उडी.
६. गोळा फेक ( ५ कि .ग्रॅ.)
७. थाळी फेक ( १.५ कि .ग्रॅ.)
८. भाला फेक ( ७०० ग्रॅम )
९. हातोडा फेक ( ५ कि.ग्रॅ.)
१०. ५००० मी.चालणे.
११. **क्रॉसकंट्री** ६ कि.मी.चे अंतर

**इ. मैदानी स्पर्धा - १९ वर्षे वयोगट मुली**

१. १००,२००,४००,८००,१५००,३००० मीटर धावणे
२. हर्डल्स ११० मी ( ०.७६२ मी.उंची )
३. हर्डल्स ४०० मी. (०.७६२ मी.उंची )
४. रिले ४ X १०० मीटर, ४ X ४०० मीटर
५. उंच उडी ,लांब उडी.तिहेरी उडी,बांबु उडी.
६. गोळा फेक ( ३ कि.ग्रॅ.)
७. थाळी फेक ( १ कि .ग्रॅ.)
८. भाला फेक ( ५०० ग्रॅम )
९. हातोडा फेक ( ३ कि.ग्रॅ.)
१०. ३००० मी.चालणे.
११. **क्रॉसकंट्री** ४ कि.मी.चे अंतर

# महाराष्ट्र शासन

## क्रीडा व युवकसेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

## जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर अंतर्गत राबविण्यात येणा-या

# विविध जिल्हास्तर व राज्यस्तर क्रीडा विकास योजना

### १. क्रीडा संकुल बांधकाम योजना

महाराष्ट्र राज्यच्या क्रीडा धोरणाअंतर्गत प्रत्येक विभाग, जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी क्रीडा संकुल उभारण्याची सुधारीत योजना शासन निर्णय, सामाजिक न्याय,सांस्कतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्र.राक्रीधो-२००३/प्र.क्र.११/क्रीयुसे-१, दि.२६ मार्च,२००३ अन्वये कार्यान्वित करण्यैंत आलेली आहे. शासनाने शासन निर्णय क्र.राक्रीधो-२००९/(प्र.क्र.२५/०९)/क्रीयुसे-1 दि.२१ मार्च, २००९ अन्वये क्रीडा संकुल बांधकामाकरिता दयावयाच्या बांधकाम अनुदान मर्यादेत वाढ केली आहे.

**अ) विभागीय क्रीडा संकुल :- ( अनुदान मर्यादा रू.२४ कोटी )**

विभागीय क्रीडा संकुलामध्ये १० लेनच्या सिंथेटिक ट्रॅकसह खुले प्रेक्षगृह, बंदिस्त जलतरण तलाव, बंदिस्त (वातानुकूलित) प्रेक्षगृह, ॲस्ट्रोटर्फ हॉकी मैदान व विविध खेळांची क्रीडांगणे, मुला मुलींची वसतिगृहे, पाणीपुरवठा/ड्रेनेज/विद्युतिकरण/अंतर्गत रस्ते/संरक्षक भिंत इत्यादी बाबींचा समावेश असून आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा साहित्य खरेदीचाही समावेश आहे.

**ब) जिल्हा क्रीडा संकुल :- ( अनुदान मर्यादा रू.८ कोटी )**

प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी जिल्हा क्रीडा संकुल उभारण्याचे प्रस्तावित आहे. जिल्हा क्रीडा संकुलामध्ये ४०० मी. ट्रॅकसह खुले प्रेक्षगृह, विविध खेळांची मैदाने, मल्टिजिम, वेटलिंफटींग, फिजिकल एक्झरसाईज हॉल, फिटनेस सेंन्टर, जलतरण तलाव, इनडोअर हॉल, मुला- मुलींची वसतिगृहे, पाणीपुरवठा/ ड्रेनेज/ विद्युतिकरण/ अंतर्गत रस्ते/संरक्षक भिंत इत्यादी बाबींचा समावेश असून क्रीडा साहित्य खरेदीचाही समावेश आहे.

**क) तालुका क्रीडा संकुल :- ( अनुदान मर्यादा रू.१ कोटी )**

तालुक्याच्या ठिकाणी तालुका क्रीडा संकुल उभारण्याचे प्रस्तावित आहे. तालुका क्रीडा संकुलामध्ये ४०० मी. धावनपथ, इनडोअर गेम हॉल, खो-खो, हॉलीबॉल, कबड्डीची प्रत्येकी दोन मैदाने, बास्केटबॉल कोर्ट/ लॉन टेनिस वा अन्य सुविधा /शूटींग रेंज पाणीपुरवठा/ड्रेनेज/विद्युतिकरण/अंतर्गत रस्ते/संरक्षक भिंत इत्यादी बाबींचा समावेश असून क्रीडा साहित्य खरेदीचाही समावेश आहे.

### २. स्वयंसिध्दा महिला स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम.

शहरी भागातील अस्थिर व असुरक्षित जीवनमान लक्षात घेता प्रत्येक महिलेला आपल्या स्वत:च्या संरक्षणासाठी निर्भय,सक्षम,स्वयंसिध्द बनविणे तसेच संरक्षणाबाबतची भिती महिलांच्या मनातून घालवून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे व निर्भय मानसिकता निर्माण करणे हाच या योजनेचा मुख्य उद्देश आहे. खेळाद्वारे सर्वासांठी सुदढता या कार्यक्रमांतर्गत सर्व नागरिकांच्या सुदढतेबरोबरच स्वसरंक्षण ही एक काळाची गरज बनली आहे. सन २००३ पासून शासनाच्या क्रीडा

विभागामार्फ़त महिलांसाठी स्वसंरक्षणाची निर्भययोजना राबविण्यात येत आहे. आजच्या काळात व्यवसायासाठी, नोकरीसाठी, शिक्षणासाठी घरातुन बाहेर पडणा-या महिलांना स्वयंसिध्द बनविणे ही सामाजिक बांधिलकी समोर ठेवुन शासनाने या योजनेची आखणी केली आहे. सर्व महिलांना आत्मविश्वासपुर्ण स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देणे हे जरुरीचे झाले आहे.या करिता शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार ज्युदो / तायक्वांदो खेळातील तज्ञ व्यक्तींशी विचारविनिमय करुन तयार केलेल्या अभ्यासक्रमानुसार महिला वर्गाला स्वंरक्षणाचे डावपेच (ज्युदो,तायक्वादो,मार्शलआर्ट,लाठी काठी,) शारीरिक तंदुरूस्तीचे व्यायाम प्रकार,योगासन,हास्यउपचार पध्दती,स्वयंरोजगार इत्यादीचे प्रशिक्षण दिले जाते. तसेच स्त्रियांच्या सर्वागिण विकासासाठी शरीररचना स्नायु दुखापती,खेळाडूचे मानसिक व शारीरिक पुनर्वसन,महिलांचे आरोग्य आहार मार्गदर्शन,व्यक्तिमत्व विकास,व्यवसाय मार्गदर्शन, स्वंयरोजगार, आणि करिअर मार्गदर्शन,होम मॅनेजमेंट,फायरब्रिगेंड ट्रेनिंग-संकल्पना,प्रात्यक्षिके ,ट्रॅफिक-नियम-माहिती -प्रात्यक्षिके महिलांच्या समस्या व निराकरण व महिला विषयक कायदयातील तरतूदी इ.विषयावर तज्ञामार्फत व्याख्यान दिले जाते

### ३. महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेमार्फत क्रीडा संस्थांना आर्थिक सहाय्य

महाराष्ट्र राज्यात क्रीडा व खेळांच्या विकासासाठी कार्यरत असलेल्या एकविध खेळाच्या जिल्हा व राज्यसंघटना, क्रीडा संस्था, क्रीडा मंडळे तसेच इतर कार्यक्रमाबरोबर क्रीडा विकासाचे कार्य करणा-या संस्थांना महाराष्ट्र राज्यक्रीडा परिषदेच्या निधीतून आर्थिक सहाय्य देण्यात येते.

शासनाने मान्यता दिलेल्या खेळांच्या जिल्हा, राज्यसंघटनांना तसेच क्रीडा संस्थांना खालील बाबींकरिता अनुदान देण्यात येते.

| बाब | राज्यसंघटना | जिल्हा संघटना | स्थानिक संघटना |
|---|---|---|---|
| निर्वाह अनुदान. | प्रति जिल्हा रु.१०००/- किंवा गत वर्षातील खर्चाच्या **५०** टक्के | कमाल रु.५०००/- किंवा गत वर्षातील खर्चाच्या **५०** टक्के | कमाल रु.५००/- किंवा गत वर्षातील खर्चाच्या ५० टक्के |
| क्रीडा साहित्य खरेदीसाठी अनुदान. | रु.५०००/- | रु.५०००/- | र.२०००/- |
| अधिकृत राज्यस्पर्धांच्या आयोजनासाठी अनुदान. | कमाल रु.१०००००/- किंवा गत वर्षातील खर्चाच्या **५०** टक्के | कमाल रु.५००००/- | -- |
| अधिकृत राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या आयोजनासाठी अनुदान. | कमाल रु.२०००००/- किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या **५०** टक्के | कमाल रु.१०००००/- | -- |

### ४. आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण करण्याकरीता अनुदान

क्रीडापीठाची संकल्पनेच्या प्रभावी अंमलबजावणीअंतर्गत आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार करण्यासाठी सहाय्यक अनुदान उपलब्ध करुन देणे. महाराष्ट्र राज्यच्या क्रीडा धोरणामुळे क्रीडा क्षेत्राला चालना मिळालेली आहे. खेळाडूंच्या कामगिरीत वाढ करण्यासाठी अत्याधुनिक साहित्य, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मार्गदर्शकाकडून मार्गदर्शन मिळाल्यास त्यांच्या कामगिरीमध्ये वाढ होऊन आंतरराष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचा नावलौकिक वाढण्याच्या उद्देशाने शासनाने शासन निर्णय क्र. राक्रीधो - ३११३/प्रक्र.२९/क्रीयुसे-३, दि.२८.४.२०१४ नुसार योजनेस मान्यता प्रदान केली आहे. खालील बाबीवर रु.५.०० लक्ष मर्यादेत अर्थसहाय्य देण्यात येते.

१.क्रीडा साहित्य आयात करणे. २.क्रीडा गणवेश आयात करणे. ३. क्रीडा प्रशिक्षणासाठी देशांतर्गत व देशाबाहेरील प्रवास, निवास, भोजन इ. ४. प्रशिक्षण कार्यक्रम शुल्क, ५ .चित्रफीत, पुस्तके इ. बाबींवरील खर्च अनुज्ञेय आहे.

## ५. व्यायामशाळा विकास अनुदान (जिल्हास्तर योजना)

पारंपारिक खेळ व क्रीडा विषयक बाबींचे जतन व्यायामशाळा व तालमी यांच्या माध्यमाव्दारे होत असून, युवकांची शारीरिक सदृढता वाढविणे हे उदिद्ष्ट साध्य करण्यासाठी स्वायत्त संस्था अतिशय महत्वाची कामगिरी बजावत आहेत.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,शासन निर्णय क्र. क्रीडाधो/संकीर्ण/प्र.क्र.४९/क्रीयुसे १ दिनांक ०८ जानेवारी २०१९.अन्वये अनुदानासाठी पात्र संस्था १) शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्था ( ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपंचायत, महानगरपालिका, जिल्हा परिषद, कॅन्टोनमेंट बोर्ड, शासकीय रुग्णालये, शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था.)

२)शालेय शिक्षण व क्रीडा विभाग व उच्च शिक्षण विभाग यांनी मान्यता दिलेल्या शाळा व महाविदयालये तसेच जिल्हा परिषद, आदिवासी विभाग व सामाजिक न्याय विभाग, अल्पसंख्यांक विभाग मार्फत चालविण्यात येणा-या सर्व शासकीय प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, आश्रमशाळा, व वसतीगृह, शासकीय उप जिल्हा रुग्णालय, शासकीय जिल्हा रुग्णालय, शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था, शासकीय वैदयकीय महाविदयालय तसेच शासनाद्वारे मान्यता दिलेल्या शैक्षणिक शाळा व महाविदयालयांना शासनामार्फत अनुदान मिळण्यास प्रारंभ होऊन ५ वर्ष पुर्ण झालेली आहेत असे शाळा व महाविदयालये अनुदानासाठी पात्र राहतील.

३) क्रीडा विभागाच्या विविध समित्या तसेच पोलीस कल्याण निधी / पोलीस विभाग, शासकीय कार्यालये / जिमखाना हे अनुदानासाठी पात्र राहतील.

## ६. क्रीडांगण विकास अनुदान (जिल्हास्तर योजना)

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.क्रीडाधो-३११३/प्र.क्र.४८/क्रीयुसे-३,दिनांक १३-२-२०१४अन्वये, ग्रामीण व नागरी व त्याचप्रमाणे आदिवासी भागात विविध खेळांची सुयोग्य क्रीडांगणे निर्माण करण्यासाठी खर्चाच्या ७५टक्के किंवा जास्तीत जास्त **७.००लाख** यापैकी कमी असेल इतके अनुदान दोन हप्त्यात अनुदानित संस्थेद्वारा अनुदाना इतकी रक्कम खर्च करण्याचे अटीवर दिले जाते. आदिवासी भागातील खाजगी संस्थांना **खर्चाच्या ९० टक्के किंवा जास्तीत जास्त रु.७.०० लाख** यापैकी कमी असेल इतके अनुदान दोन हप्त्यात देण्यात येते. आदिवासी विभागामार्फत चालविल्या जाणा-या शासकीय आश्रमशाळांना १०० टक्के अनुदान परंतु कमाल रु.७.०० लाख इतके अनुदान दोन हप्त्यात देण्यात येते. तसेच क्रीडा साहित्यासाठी ३ लक्ष इतके अनुदान देण्यात येते. हे अनुदान राज्यतील खाजगी शैक्षणिक संस्थेद्वारा चालविण्यात येणा-या माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये तसेच विविध खेळांच्या विकासासाठी कार्यरत असणा-या स्वयंसेवी क्रीडामंडळे, युवक मंडळे व महिला मंडळे याशिवाय आदिवासी मुलांमुलींकरिता शासनामार्फत कार्यरत आश्रमशाळांना देण्यात येते.

## ७. समाजसेवा शिबीर भरविणे (जिल्हास्तर योजना)

राज्यतील १५ ते ३५ वयोगटातील विद्यार्थी व विद्यार्थीतर युवकांना शारीरिक श्रमाची कल्पना यावी यासाठी समाजसेवा शिबिराचे आयोजन करण्यात येते. याअंतर्गत युवकांचे शारीरिक श्रम व कठीण परिश्रम यांचे महत्व पटेल असे रचनात्मक कार्यक्रम आयोजित करणे. युवकांच्या समस्येबाबत चर्चा घडवून आणणे. शिबिरात प्रत्येक दिवशी सकाळी शारीरिक कवायती व

सायंकाळी खेळांचे सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करणे इ. कार्यक्रम अंतर्भुत आहेत. या योजनेअंतर्गत युवक कल्याण क्षेत्रात कार्यरत असणा-या पंजीबध्द संस्थानां त्यास्तीत ज्यास्त रु.२५,०००/- पर्यंत अनुदान देण्यात येते.

## ८. ग्रामीण व शहरी युवक मंडळ आर्थिक सहाय्य (जिल्हास्तर योजना)

**ग्रामिण** तसेच शहरी भागातील १५ ते ३५ वर्षे वयोगटातील युवकांसाठी समाजसेवा शिबिर, युवा नेतृत्व प्रशिक्षण शिबीराचे आयोजन, अस्पृश्यता विरोधी मोहिम. आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी, प्रथमोपचार, स्वयंरोजगार कार्यक्रम, जिल्हा व तालुका पातळीवर युवक महोत्सवाचे आयोजन. युवक पत्रिका प्रकाशित करणे. युवकांच्या समस्येवर चर्चासत्र, वाद-विवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, काव्य गायन स्पर्धा, ग्रामीण विकास कार्यक्रम उदा.वृक्षरोपण, स्वच्छता मोहिम, आरोग्य व स्वच्छता विषयक शिबीरे. बेरोजगार युवकांसाठी कार्य केंद्र स्थापन करणे. सांस्कृतिक कार्यक्रम उदा.नाटय, नृत्य, संगीत इ. बाबत स्पर्धा, युवक आदान प्रदान कार्यक्रम आयोजित करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना एक किंवा अनेक कार्यक्रम राबविण्यासाठी एका आर्थिक वर्षात ज्यास्तीत ज्यास्त रु. २५,०००/- इतके आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात येते.

## ९. क्रीडा प्रबोधिनी

राज्यातून जास्तीत जास्त आंतरराष्ट्रीय किर्तीचे खेळाडू तयार व्हावेत यासाठी नेमलेल्या उच्चस्तरीय तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार राज्यातील खेळ परंपरा, उपलब्ध क्रीडा सुविधा व अंत:सामर्थ्य यांचा सारासर विचार करून राज्यात पुणे, कोल्हापूर, नाशिक, ठाणे, अमरावती, नागपूर, गडचिरोली, अकोला, औरंगाबाद, प्रवरानगर (जि.अहमदनगर), सांगली अशा ११ ठिकाणी क्रीडा प्रबोधिनी व या सर्व प्रबोधिनींवर देखरेख ठेवणारी तसेच उच्चतम दर्जाचे क्रीडा प्रशिक्षण देणारी एक मध्यवर्ती क्रीडा संस्था शिवछत्रपती क्रीडानगरी, पुणे येथे कार्यरत आहे. क्रीडा प्रबोधिनी प्रवेशाकरीता शिक्षण संचालनालय व क्रीडा व युवकसेवा संचालनालय यांच्या संयुक्त विदयमाने शाळास्तरावर, तालुकास्तरावर व जिल्हास्तरावर संबंधित जिल्हयातील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, शिक्षणाधिकारी कार्यालय, तालुका क्रीडा अधिकारी कार्यालय व गटशिक्षणाधिकारी कार्यालय यांचे मार्फत व राज्यपातळीवर शिवछत्रपती क्रीडापिठामार्फत महाराष्ट्रातील ८ ते १४ वयोगटातील मुला-मुलीं साठी क्रीडा नैपुण्य चाचण्यांचे आयोजन करुन पात्र मुला-मुलींच्या वैदयकीस तपासणी अहवालानुसार प्रशिक्षणार्थींची अंतिम प्रवेशासाठी निवड करण्यात येते. अशा खेळाडूंना संबंधित खेळाचे विशेष प्रशिक्षणासह निवास, भोजन व शालेय शिक्षणाची सुविधा शासनाच्या संपूर्ण खर्चाने उपलब्ध करुन दिली जात आहे.

## १०. क्रीडा महोत्सव.

क्रीडा आणि युवक सेवा संचालनालयामार्फत तालुका, जिल्हा, विभागीय आणि राज्यस्तरावर शालेय, ग्रामीण, महिला, क्रीडा स्पर्धा याशिवाय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल, ज्युनिअर व सब ज्युनिअर नेहरु हॉकी इ. स्पर्धांचे आयोजन प्रतिवर्षी करण्यात येते. राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन संचालनालयाव्दारा संबंधित जिल्हयांच्या जिल्हा क्रीडा परिषदेच्या सहकार्याने करण्यात येते. वरील सर्व स्पर्धांतील सर्व खेळाडूंचा निवास, प्रवास, भोजन खर्च तसेच पंच, निवड समिती सदस्य यांचा प्रवास व दैनंदिन भत्ते व स्पर्धा आयोजन खर्च या योजनेअंतर्गत करण्यात येतो. राज्यस्तरीय स्पर्धेतून संबंधित खेळाच्या प्रातिनिधीक संघासाठी खेळाडूंची निवड करुन राष्ट्रीय स्पर्धेकरिता शासनामार्फत संघ पाठविण्यात येतो.

**११. शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार.**

राज्याच्या क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या व्यक्ति तसेच खेळाडू यांचा यथोचित गौरव करण्यासाठी खालील क्रीडा पुरस्कार शासनातर्फे प्रदान करण्यात येतात.

१) शिवछत्रपती राज्यक्रीडा जीवन गौरव पुरस्कार
२) क्रीडा मार्गदर्शकांसाठी उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार
३) शिवछत्रपती राज्यक्रीडा पुरस्कार (खेळाडू/संघटक कार्यकर्ते)
४) राज्यसाहसी क्रीडा पुरस्कार
५) एकलव्य राज्यक्रीडा पुरस्कार
६) संघटक / कार्यकर्ते यांस जिजामाता राज्यक्रीडा पुरस्कार
७) जिल्हा क्रीडा पुरस्कार

**१२. राज्य क्रीडा विकास निधी स्थापना :**

क्रीडा संस्कृतीची जोपासना व संवर्धन राज्यमध्ये परिणामकारक रित्या करण्याच्या दृष्टीने व राज्यात क्रीडा सुविधा निर्माण करणे, दर्जेदार खेळाडूंना परदेशी क्रीडा मार्गदर्शकाची सेवा उपलब्ध करुन देणे नावाजलेल्या खेळाडूंना अर्थसहाय्य करणे, काही गुणवान खेळाडू व संघ दत्तक घेऊन त्यांच्याव्दारे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विजेते खेळाडू घडविणे व क्रीडा विकासामध्ये शासकीय संस्था, निमशासकीय संस्था, औद्योगिक व वाणिज्यीक प्रतिष्ठाणे, स्वयंसेवी संस्था यांचा सहभाग करणे.

**१३. अद्ययावत व्यायामशाळा विकास व कुस्ती, ज्युदो, कराटे जिम्नॅस्टिक्स, ॲथलेटिक्स, वेटलिफिटंग, स्विमींग खेळांचे अद्ययावत साहित्य अनुदान**

राज्यातील व्यायामशाळांचा विकास घडवून राज्यतील युवकांच्या शारीरिक क्षमतेचा विकास करण्याकरिता शासनामार्फत क्रीडा संस्था, व्यायामशाळा, शैक्षणिक संस्थांना जास्तीत जास्त रु.१,००,०००/- व शासकीय अनुदानाच्या २५ टक्के रक्कम संस्थेचा हिस्सा अशा एकूण रक्कमेचे आधुनिक व्यायाम साहित्य याशिवाय जिम्नॅस्टिक , थलेटिक्स, वेटलिफिटंग, व स्विमींग या खेळाचे साहित्य शासनातर्फे पुरविण्यांत येते.

शासकीय अनुदानातून व्यायाम साहित्याची मागणी करण्यासाठी नोंदणीकृत संस्थेकडे स्वत:च्या मालकीच्या अथवा दीर्घ मुदतीच्या कराराच्या जागेवर किमान ५०० चौ. फूट व बांधकाम नियमानुसार उंचीची इमारत आवश्यक आहे. तथापि जिम्नॅस्टिक,ॲथलेटिक्स, वेटलिफिटंग व जलतरण खेळाचे अद्ययावत साहित्यासाठी संबंधित संस्थेकडे इमारतीची आवश्यकता नाही तथापि, त्या त्या खेळाच्या सुविधा असणे आवश्यक आहे.

**१४. राष्ट्रीय व आतंरराष्ट्रीय स्तरावर अतुलनीय कामगिरी केलेल्या वयोवृध्द खेळाडूनां मानधन.**

राज्याचे नाव राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्वल केलेल्या खेळाडूंना वृध्दापकाळात सन्मानाने जीवन जगता यावे या करीता मानधनात वाढ करण्याचा महत्वपूर्ण निर्णय शासनाने घेतलेला आहे. सुधारीत मानधन १ एप्रिल २०१० पासुन देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. महाराष्ट्र केसरी हा किताब प्राप्त करणा-या कुस्तीगीराचा समावेश वयोवृध्द खेळाडूच्या मानधन योजनेत करण्याचा महत्वपुर्ण निर्णय दि. ६ मार्च २०१० रोजी शासनाने घेतलेला आहे.

**२१ डिसेंबर २०१२ च्या शासन निर्णयानुसार खालील प्रमाणे मानधनात वाढ करण्यात आलेली आहे.**

| स्पर्धेचा स्तर | प्रचलित मानधन | सुधारित मानधन |
|---|---|---|
| राष्ट्रीय स्तर वयोवृध्द खेळाडू | रु. १५००/- | रु. २,५००/- |
| आंतरराष्ट्रीय स्तर वयोवृध्द खेळाडू (ऑलिम्पिक/जागतीक कुस्ती स्पर्धा) (आशियाई/एशीयन/राष्ट्रकुला) | रु. ३०००/-<br>रु. ३०००/- | रु. ६,०००/-<br>रु. ४,०००/- |
| हिंदकेसरी, रुस्तमे-हिंद, महान भार केसरी, भारत केसरी, महाराष्ट्र केसरी किताबप्राप्त कुस्तीगीर | रु. ४,०००/- | रु. ६,०००/- |

## १५. कुस्ती कला विकासासाठी आर्थिक मदत.

राज्यात कुस्ती कलेच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र राज्यकुस्तीगीर परिषद यांचेव्दारा उदयोन्मुख हौशी कुस्तीगीरांसाठी सामने व शिबीरे भरविली जातात. वार्षिक अधिवेशनांत गादी व माती विभागात विविध गटांखाली कुस्त्यांच्या चढाओढी होऊन प्रत्येक वजन गटातील प्रथम सहा क्रमांकाच्या कुस्तीगिरानां पुढील प्रमाणे दरमहा मानधन देण्यात येते.

| प्रथम | व्दितीय | तृतीय | चतुर्थ | पाचवा | सहावा | सहा क्रमांकानतंर सर्व सहभागी कुस्तीगिरानां |
|---|---|---|---|---|---|---|
| २४०० | २२०० | २००० | २००० | १६०० | १४०० | १००० |

उदयोन्मुख (कुमार गट) कुस्तीगिरांसाठी

| प्रथम | व्दितीय | तृतीय | चतुर्थ | चार क्रमांकानतंर सर्व सहभागी कुस्तीगिरानां |
|---|---|---|---|---|
| २००० | १५०० | १००० | १००० | ६०० |

ग्रिकोरोमण प्राविण्यप्राप्त कुस्तीगिरांसाठी

| प्रथम | व्दितीय | तृतीय | चतुर्थ | पाचवा | सहावा |
|---|---|---|---|---|---|
| २४०० | २००० | १५०० | १५०० | १२०० | १००० |

प्राविण्यप्राप्त महिला कुस्तीगिरांसाठी

| प्रथम | व्दितीय | तृतीय | चतुर्थ |
|---|---|---|---|
| २४०० | २००० | १५०० | १५०० |

## १६. क्रीडा नैपुण्य शिष्यवृत्ती

राज्यात तालुका ते राष्ट्रीय स्तरावर भारतीय खेल महासंघ तसेच भारतीय क्रीडा प्राधिक्ररणाच्या शालेय, महिला, ग्रामीण(पायका) क्रीडा स्पर्धाचे आयोजन क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत प्रतिवर्षी करण्यात येते. महाराष्ट्र राज्य हे गत पाच वर्षापासून शालेय क्रीडा स्पर्धेत पदक तालिकेत अग्रस्थानावर आहे.

राज्यातील खेळाडू करीत असलेल्या क्रीडा कामगिरिची दखल घेउन खालील प्रमाणे शिष्यवृत्तीत वाढ करण्याचा तसेच आंतरराष्ट्रीय शालेय स्पर्धेत प्राविण्य संपादन व सहभाग घेणा-या खेळाडूंना मानधन देण्याचा महत्वपुर्ण निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,शासन निर्णय क्र.अताप्र-१००८/ (प्र.क्र.४२८/०८)/क्रीयुसे-२,दि.२२ मार्च २०१० अन्वये घेतला आहे.

| प्राविण्य | प्रचलित शिष्यवृत्ती रक्कम | सुधारीत शिष्यवृत्ती रक्कम | आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा प्रचलित शिष्यवृत्ती रक्कम | आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा वार्षीक शिष्यवृत्ती रक्कम |
|---|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | ९,०००/- | ११,२५०/- | २४,०००/- | ३०,०००/- |
| द्वितीय क्रमांक | ७,२००/- | ८,९५०/- | १८,०००/- | २२,५००/- |
| तृतीय क्रमांक | ५,४००/- | ६,७५०/- | १२,०००/- | १५,०००/- |
| सहभाग | ३,०००/- | ३,७५०/- | ९,०००/- | ११,२५०/- |

## १७. जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रची स्थापना.

राज्यातील प्रत्येक जिल्हयांत जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रची स्थापना करुन या केंद्रचे ठिकाणी क्रीडा प्रशिक्षणाच्या अदयावत सुविधा उपलब्ध करुन घेऊन या सुविधांच्या माध्यमातून जिल्हयातील खेळाडूनां नियमित स्वरुपात क्रीडा प्रशिक्षण देण्यात येईल.

राज्यतील ज्या जिल्हयात जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केद्र स्थापन होण्यास शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे असे केद्र अनुदानास पात्र समजण्यात येईल. मान्यता प्राप्त जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रने आवश्यक त्या कागदपत्रांसह संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा क्रीडा परिषद यांचे कडे अर्ज सादर करावा त्यानीं सदर अर्ज आयुक्त क्रीडा व युवकसेवा महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडे मंजूरीसाठी सादर करावा.

जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रांस क्रीडा साहित्य व क्रीडा प्रशिक्षण उपकरणे, खेळाडूनां ट्रॅकसूट व गणवेश,अंशकलीन मैदान सेवकाचे मानधन,क्रीडा विषयक वाड:मय,सी.डी.पुस्तके, नियतकालीके, मासिके इ.कार्यालयीन/सादील खर्च, प्रशिक्षकाचां प्रवास खर्च, क्रीडांगण देखभाल व दुरुस्ती, चर्चासत्र/ परिसवाद/उजळणी वर्ग(वर्षातून किमान दोन वेळा) समुपदेशन, प्रशिक्षण केंद्रच्या प्रसिध्दीसाठी ब्रोशर तयार करणे, प्लेक्स बोर्ड, पोस्टर्स, स्थानिक वृत्तपत्र/केबल वाहिनी व प्रशिक्षण शिबीर इ. करिता दरवर्षी प्रति जिल्हा अनुदान देण्यात येते.

## १८. क्रीडा गुण सवलत:-

इयत्ता १०वी व इयत्ता १२ वी परिक्षेस बसलेल्या व मान्यताप्राप्त राज्य ,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणा-या खेळाडूंना यापुर्वी अंतिम परिक्षेत नापास झाल्यास सवलतीचे २५ गुण फक्त उतीर्ण होण्याकरीताच देण्यात येत होते.

तथापी शासनाने दि.२१ एप्रिल २०१५ च्या सुधारीत शासन निर्णयानुसार फक्त अनुतीर्ण खेळाडूंना देण्यात येणारे सवलत गुणाची तरतुद बंद केली आहे. व शासनाने दि.२० डिसेंबर २०१८ च्या इयत्ता ६ वी ते १२ वी पर्यंत केव्हाही जिल्हा/ विभाग/ राज्य/ आंतराराष्ट्रीय स्तरावर खेळलेल्या खेळाडू विद्यार्थ्यास माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षेत(इ.१०वी) व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षेत(१२ वी) बसलेल्या खेळाडूंना २५ जानेवारी २०१९ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट- ६ प्रमाणे सुधारीत सवलत देणेचा शासनाने निर्णय घेतला आहे .

## सुधारित परिशिष्ट ६

## [माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) किंवा उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणा-या खेळाडु विद्यार्थ्यांना वाढीव क्रीडागुण सवलतीचा अनुज्ञेय तक्ता]

| स्पर्धेचा स्तर | क्रीडा स्पर्धेचा प्रकार व आयोजक | क्रीडा सवलतीचे अनुज्ञेय गुण | |
|---|---|---|---|
| | | **प्राविण्य प्रथम ते तृतीय** क्रमांक पर्यंत | **इतर सर्व सहभागी खेळाडू** |
| जिल्हास्तर | क्रीडा व युवक सेवा संचालनयाद्वारा आयोजित विभागीय शालेय क्रीडा स्पर्धा, नेहरु हॉकी कप, सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल क्रीडा स्पर्धा व केंद्र शासनाच्या क्रीडा व कल्याण विभागाच्या भारतीय खेळ प्राधिकरणाने पुरस्कृत केलेल्या विभागीय क्रीडा स्पर्धा, "पॅरालिंपिक्स कमिटी ऑफ इंडीया" मार्फत दिव्यांग विद्यार्थ्याकरिता आयोजित केलेल्या क्रीडा स्पर्धा तसेच स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडीया मार्फत आयोजित स्पर्धा तसेच स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडीया यांच्याशी संलग्न खाजगी असोसिएशन मार्फत आयोजित स्पर्धा. | ०५ | ०० |
| विभागस्तर | क्रीडा व युवक सेवा संचालनयाद्वारा आयोजित विभागीय शालेय क्रीडा स्पर्धा, नेहरु हॉकी कप, सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल क्रीडा स्पर्धा व केंद्र शासनाच्या क्रीडा व कल्याण विभागाच्या भारतीय खेळ प्राधिकरणाने पुरस्कृत केलेल्या विभागीय क्रीडा स्पर्धा, "पॅरालिंपिक्स कमिटी ऑफ इंडीया" मार्फत दिव्यांग विद्यार्थ्याकरिता आयोजित केलेल्या क्रीडा स्पर्धा तसेच स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडीया मार्फत आयोजित स्पर्धा तसेच स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडीया मार्फत आयोजित स्पर्धा | १० | ०५ |
| राज्यस्तर | १) क्रीडा व युवक सेवा संचालनयाद्वारा आयोजित राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा,नेहरु हॉकी कप,सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल क्रीडा स्पर्धा व केंद्र शासनाच्या क्रीडा व कल्याण विभागाच्या भारतीय खेळ प्राधिकरणाने पुरस्कृत केलेल्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा, "पॅरालिंपिक्स कमिटी ऑफ इंडीया" मार्फत दिव्यांग विद्यार्थ्याकरिता आयोजित केलेल्या क्रीडा स्पर्धा तसेच स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडीया मार्फत आयोजित स्पर्धा तसेच स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडीया यांच्याशी संलग्न खाजगी असोसिएशन मार्फत आयोजित स्पर्धा. | १५ | १० अथवा १२<br><br>(जिल्हास्तरावरुन थेट राज्यस्तरावर सहभाग असल्यास १० गुण )<br>(विभागस्तरावरुन राज्यस्तरावर सहभाग असल्यास १२ गुण ) |
| | २. महाराष्ट्र शासनाच्या अपंग कल्याण विभागाद्वारा आयोजित राज्यस्तर अपंग क्रीडा स्पर्धा. | | |
| | ३. महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाद्वारा आयोजित राज्यस्तर आदिवासी क्रीडा स्पर्धा. | | |
| | ४.एकविध खेळांच्या राज्य संघटनेद्वारा आयोजित राज्य अजिंक्यपद स्पर्धा | | |

| | | | |
|---|---|---|---|
| राष्ट्रीय स्तर | १) भारतीय शालेय खेळ महासंघाद्वारा आयोजित राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा.<br>२) केंद्र शासनाचा क्रीडा व कल्याण विभागाच्या भारतीय खेल प्राधिकरणाने पुरस्कृत केलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा.<br>३) सुब्रोतो मुखर्जी स्पोर्ट्स एज्युकेशन सोसायटी व जवाहरलाल नेहरू हॉकी टूर्नामेंट सोसायटी द्वारा आयोजित सदर खेळांच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा.<br>४) अधिकृत एकविध खेळांच्या राष्ट्रीय फेडरेशनद्वारा आयोजित राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा.<br>५) "पॅरालिंपिक्स कमिटी ऑफ इंडीया " मार्फत दिव्यांग विद्यार्थ्याकरिता आयोजित केलेल्या क्रीडा स्पर्धा.<br>६) स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडीया मार्फत आयोजित स्पर्धा तसेच स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडीया यांच्याशी संलग्न खाजगी असोसिएशन मार्फत आयोजित स्पर्धा. | २० | १५ |
| आंतरराष्ट्रीय | १) ऑलिम्पिक , एशियन गेम्स , व कॉमनवेल्थ गेम्स. | २५ | २० |
| | २) अधिकृत एकविध खेळांच्या आंतरराष्ट्रीय फेडरेशन्द्वारा आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा. | २५ | २० |
| | ३) आंतरराष्ट्रीय शालेय महासंघाद्वारा आयोजित आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा | २० | १५ |

तथापि १० वी पूर्वी विद्यार्थ्याने प्राविण्य मिळविलेले असेल तरी, सवलतीचे गुण मिळण्याकरिता त्या विद्यार्थ्याने इ. १० वी मध्ये क्रीडा प्रकारामध्ये सहभागी होणे आवश्यक राहील.१२ वी पूर्वी विद्यार्थ्याने प्राविण्य मिळविलेले असेल तरी, सवलतीचे गुण मिळण्याकरिता त्या विद्यार्थ्याने इ. १२ वी मध्ये क्रीडा प्रकारामध्ये सहभागी होणे आवश्यक राहील.

## १९. पुरस्कार विजेते खेळाडू व कुस्तीगीर यांना सदनिका मिळणेबाबत

प्रचलित नियमानुसार रुस्तम ए हिंद,महान भारत केसरी,हिंदकेसरी किताब पटकाविणा-या कुस्तीगीर यांना मा.मुख्यमंत्री महोदय यांचे स्वेच्छाधिकारामधुन सदनिका मिळणकरीता सवलत देण्यात येत होती.दि. १८ मार्च २०१३ च्या शासन निर्णयामध्ये पद्म पुरस्कार,ऑलिम्पीक,एशियन व राष्ट्रकुल स्पर्धेमधील पदक विजेत्यांना सदर योजनेमधुन सदनिका मिळणेसाठी पात्र ठरविण्याबाबतची तरतुद करणेत आलेली आहे.

## २०. इ ११ वी प्रवेशासाठी खेळाडूंना आरक्षण

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. उमाशि -२०१५/ प्र.क्र.२६२ / एस.डी.२ दि.२० डिसेंबर २०१८ , अन्वये ११ वी प्रवेशाकरिता खेळाडूकरिता निश्चित करण्यात आलेला कोटा केवळ आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धामध्ये सहभागी होणारे खेळाडु विद्यार्थी व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धामधील पदक विजेते खेळाडु विद्यार्थी यांच्याकरीताच उपलब्ध राहिल अन्य खेळाडु विद्यार्थ्यांना शासन निर्णयातील परिशिष्ट ६ मधील विहित केल्याप्रमाणे फ़क्त गुणांची सवलत अनुज्ञेय राहिल.

## २१. अत्त्युच्य गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी आरक्षण

खेळाडूंना नोकरीमध्ये आरक्षण असावे याकरीता शासनाने ऐतिहासीक निर्णय घेतला आहे. राज्य, राष्ट्रीय, आतंरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत प्राविण्य प्राप्त करणा-या खेळाडूंना शासन सेवेत ५ टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे.

शासनाच्या विविध विभागात, शासनाच्या मालकीच्या व नियंत्रणाखाली असलेल्या महामंडळात, स्थनिक प्राधिकरणात व विविध स्वरुपात शासकीय सवलती प्राप्त केलेल्या संस्थांमध्ये राज्यतील अत्त्युच्य गुणवत्ताप्राप्त खेळाडूंसाठी नोक-यांमध्ये आरक्षण ठेवण्याचा निर्णय, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/ क्रीयुसे-२, दि.३०एप्रिल, २००५, २१ जून, २००६ व दि.१८ नोव्हेंबर, २००६ अन्वये घेतला आहे.

खेळाडूंना शासकीय/निमशासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्याचा राज्यशासनाने महत्वपूर्ण निर्णय घेतला असून “अ” संवर्गासाठी ऑलिम्पिक, आशियाई, जागतिक अजिंक्यपद स्पर्धा, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा तसेच “ब” संवर्गा साठी युवा राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा, आशियाई अजिंक्यपद स्पर्धा, ज्युनि. जागतिक अजिंक्यपद स्पर्धा इत्यादी स्पर्धेतील प्राविण्यधारक खेळाडू हा पात्र राहणार आहे. शूटींगमध्ये जागतिक विक्रमाची बरोबरी साधणारी कु. तेजस्विनी सावंत, श्री. नवनाथ फरताडे-शुटींग, श्री. अजय लाकरा - (हॉकी), श्री. नरसिंग यादव - कुस्ती, श्री. सुहास खामकर- शरीर सौष्ठव, श्रीमती. स्नेहल साळूंखे - कब्बडी, श्रीमती. राही सरनोबत- शूटींग, श्रीमती. दिपिका जोसेफ़ - कबड्डी, श्रीमती. सुवर्णा बारटक्के - कबडडी, श्रीमती. अभिलाशा म्हात्रे - कबड्डी, श्री. विरधवल खाडे- स्विमींग, श्रीमती . किशोरी शिंदे - कबड्डी, श्री.संदीप तरटे - शूटींग, श्रीमती. विजया नर-पॉवरलिफटींग, श्रीमती. विद्या शिरस-वेटलिफ्टींग, श्रीमती उज्वला माने-वेटलिफ्टींग, श्री.जगन्नाथ लकडे- ॲथलेटिक्स, श्री. तृणाल हेलेगांवकर- सेलिंग, श्री. करण रस्तोगी-टेनिस, श्रीमती. प्राजक्ता सावंत- बॅडमिंटन, श्रीमती. मानसी गावडे - स्विमींग, श्रीमती. सायली जाधव - कबड्डी , श्रीमती. नेहा सापते-शुटींग, श्रीमती. भक्ती आंब्रे- पॉवरलिफटींग, श्रीमती.अंकीता मयेकर- पॉवरलिफटींग, श्री.ओम लोटलीकर - टेबल टेनिस या खेळाडूंना राज्य शासनाच्या वतीने शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्यात आली आहे.

आतापर्यंत ५००० खेळाडूंना शासकीय नोकरीचा लाभ देण्यासाठी कामगिरी (५ टक्के खेळाडू आरक्षणात ) प्रमाणीत करुन देण्यात आलेली आहे.

**सदर योजनेचा नविन शासन निर्णय दिनांक १ जुलै २०१६ अन्वये झाला आहे.**

## २२. स्व. खाशाबा जाधव चषक कुस्ती व छ. शिवाजी चषक कबड्डी, भाई नेरुरकर खो-,खो स्पर्धा, व्हॉलीबॉल चषक स्पर्धा :

महाराष्ट्राची क्रीडा संस्कृती जोपासण्यासाठी व वाढ होण्यासाठी विविध खेळाच्या माध्यमातून युवा पिढीला खेळाकडे आकृष्ट करणे व त्यांच्यातील क्रीडा गुणांना वाव देण्यासाठी स्व. खाशाबा जाधव चषक कुस्ती स्पर्धा व छ. शिवाजी चषक कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. यामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या खेळाडू बरोबर खेळण्याची संधी तसेच जवळून कौशल्य पाहण्याची संधी राज्यतील खेळाडूंना मिळत आहे.

## २३. राज्याचे युवा धोरण २०१२

देशाचे युवा धोरण सन २००३ मध्ये जाहिर करण्यात आले आहे. राज्यतील १३ ते ३५ वयोगटातील युवा लोकसंख्येचा विचार करता देशाच्या युवा धोरणाच्या अनुषंगाने राज्यचे स्वतंत्र युवा धोरण तयार झाल्यास त्याव्दारे युवा कल्याणाच्या विविध योजना राबविणे शक्य होणार आहे. या पार्श्वभूमीवर एकंदरीतच राज्यच्या युवक कल्याण क्षेत्राचा आढावा घेऊन नवीन युवा धोरण ठरविण्याकरीता मा. मंत्री (क्रीडा व युवककल्याण) अध्यक्ष व मा. राज्यमंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांच्या उपाध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्याचा निर्णय शासनाने दिनांक २० फेब्रुवारी २०१० च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. या समितीत २९ सदस्यांचां अंतर्भाव होता.

देशाचे युवा धोरण २००३ व त्यानतंर युवककल्याण क्षेत्रात झालेले विविध बदल विचारात घेऊन राज्यचे नवीन युवा धोरण ठरविण्याकरीता सहाय्यभूत होतील अशा सर्वकर्ष शिफारशी करणे अशी या समितीची कार्यकक्ष होती. दि. १४ जुन २०१२ रोजी महाराष्ट्र राज्यचे युवा धोरण-२०१२ जाहीर झाले असुन, शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. त्या अनुषांगीक ६ योजनांचे शासन निर्णय प्राप्त झाले असून, त्या योजना खालील प्रमाणे आहेत.

### १. युवा वसतीगृहाची स्थापना -

राज्याचे युवा धोरण-२०१२ अंतर्गत राज्यतील युवांना विविध उपक्रमामध्ये सहभागी होत असताना निवास ही समस्या न राहता त्यांना वसतीगृहे आधार देणारे ठिकाण असणे आवश्यक आहे. वसतीगृहाची सुविधा उपलब्ध झाल्यास युवा त्यांच्या कार्यावर लक्ष केंद्रित करुन प्रगतीच्या संधीचा योग्य फायदा घेतील या उद्देशाने शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.युकयो.२०१२/प्र.क्र.६६/क्रीयुसे-३ दिनांक २८ एप्रिल, २०१४ अन्वये राज्यत सहा महसुल विभागाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी रु.४.०० कोटी अनुदानाच्या मयादेत १०० युवक, युवतीच्या निवास व्यवस्थेसाठी युवा वसतिगृह उभारण्यात येणार आहेत.

### २. युवा महोत्सवाचे आयोजन -

राज्याचे युवा धोरण २०१२ अंतर्गत राज्यची संस्कृती व परंपरा जतन करण्यासाठी तसेच राष्ट्रीय एकात्मता व युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी राज्यतील १३ ते ३५ वयोगटातील युवकांसाठी शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.युकयो-२०११२/प्र.क्र.६७/क्रीयुसे-३ दि.६ जानेवारी, २०१४ अन्वये जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये युवा महोत्सवामध्ये लोकनृत्य, लोकगीत, एकांकिका (इंग्रजी व हिंदी) शास्त्रीय गायन (हिंदुस्थानी),शास्त्रीय नृत्य,सितार,बासरी, तबला, विणा,मृदूंग, हार्मोनियम, मिटार, मणीपुरी नृत्य, ओडिसी नृत्य, भरतनाटयम, कथ्यक, कुचिपुडी नृत्य, व वक्तृत्व या प्रकारच्या स्पर्धात्मक बाबीमध्ये तर राज्यच्या संस्कृतिचे दर्शन घडविणा-या दोन कार्यक्रमाध्ये स्पर्धा घेवून यातील पात्र युवकांना राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये राज्यचा प्रतिनिधीक संघ सहभागी करण्यात येणार आहे.

### 3. युवा नेतृत्व व व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षण व इतर युवक कल्याणकारी कार्यक्रम -

राज्याचे युवा धोरण-२०१२ अंतर्गत राज्यतील युवक कल्याण क्षेत्रात परिणामकारक बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने युवकांना जीवनात ध्येय निश्चित करण्यास मदत करण्यासाठी व ते गाठण्यासाठी प्रेरीत करण्याकरिता युवकांमधील नेतृत्व व व्यक्तिमत्वाचा विकास घडवून

आणण्याकरीता त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.युकयो.२०१३/प्र.क्र.८/क्रीयुसे-३ दिनांक २८ एप्रिल, २०१४ अन्वये राज्यत प्रतिवर्षी यशदा सारख्या शासकीय संस्था मार्फत ६ शिबीरांचे आयोजन करण्यात येणार आहे. प्रत्येक शिबीरामध्ये राज्यतील ३५ जिल्हयातून जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त केलेल्या एका युवक व युवतीस पाचारण करण्यात येणार आहे. सदर ७० युवकांना त्यांच्या नेतृत्व गुणांचा व व्यक्तिमत्वाचा विकास घडवून आणणेसाठी १५ दिवसांच्या निवासी प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे.

**४. राज्य युवा विकास निधीस अनुदान -**

राज्याचे युवा धोरण २०१२ अंतर्गत युवकांना व युवा क्षेत्रात काम करणा-या संस्थांना युवक कल्याण विषयक उपक्रमांना सहाय्यक करणेसाठी शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.युकयो. २०१३/ प्र.क्र.६६/क्रीयुसे-१ दि.१९ डिसेंबर २०१३ अन्वये राज्ययुवा विकास निधी ची स्थापना केलेली आहे. यामधून राज्यतील युवक, युवती व संस्थांना युवा कल्याणकारी उपक्रम, युवक कल्याण क्षेत्रात संशोधन, युवकांना शिष्यवृत्ती/फेलोशिप, युवांच्या सक्षमीकरणाकरीता उपक्रम, युवा विकाससंबंधी साहित्य निर्मिती, युवांच्या समस्या व त्यावरील उपाययोजना शोधण्याकरीता सर्वेक्षण, युवांसाठी चर्चासत्रे, कार्यशाळा, शिबीर, उदद्बोधन वर्ग आयोजित करणे इ.साठी अर्थसहाय्य करण्यात येत

**५. राज्य युवा प्रशिक्षण केंद्रांची स्थापना –**

राज्याचे युवा धोरण-२०१२ अंतर्गत राज्यतील युवांच्या सक्षमीकरणाकरीता शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.युकयो.२०१२/प्र.क्र.६३/क्रीयुसे-३ दि.१२ नोव्हेंबर,२०१३ अन्वये राज्ययुवा प्रशिक्षण केंद्र शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी,पुणे येथे सुरु केलेले आहे. हे केंद्र युवांच्या गरजा ओळखून त्या गरजांच्या पुर्ततेकरीता शिका, नेतृत्व करा, व योगदान द्या. या सिध्दांतानुसार कार्यरत रहाणार असून शिक्षण, युवा सक्षमीकरणाकरीता विविध प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा, सेमीनार इ.चे आयोजन तसेच सल्ला व सहाय्य या बाबींवर लक्ष केंद्रित करणार आहे. सदर केंद्रमार्फत विविध विषयांचे १० व ३० दिवसांचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविण्यात येतील. केंद्रमार्फत युवक कल्याण क्षेत्रात नवनविन संकल्पना राबविण्याकरीता नियमित संशोधन कार्य करण्यात येईल. संशोधन कार्य करण्याकरीता तज्ञ व्यक्ती/संस्थेस दरवर्षी आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

**६. युवा पुरस्कार –**

राज्याचे युवा धोरण-२०१२ अंतर्गत राज्यतील व जिल्हयातील युवांनी केलेल्या समाजहिताच्या कार्याचा गौरव व्हावा व युवा विकासाचे कार्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.युकयो.२०१२/प्र.क्र.६५/क्रीयुसे-३ दिनांक १२ नोव्हेंबर,२०१३ अन्वये प्रतिवर्षी जिल्हा व राज्यस्तरावर एक युवक, एक युवती व एका संस्थेस युवा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्काराचे स्वरुप जिल्हास्तरावर युवक व युवतीस रोख रुपये १०,०००/- संस्थेस रुपये ५०,०००/- तसेच गौरवपत्र, सन्मानचिन्ह असे असेल तर पुरस्काराचे स्वरुप राज्यस्तरावर युवक व युवतीस रोख रुपये.५०,०००/- संस्थेस रुपये १,००,०००/- तसेच गौरव पत्र, सन्मानचिन्ह असे असणार आहे.

२४. **राज्याचे क्रीडा धोरण २०११.**

देशात क्रीडा धोरण जाहिर करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्यआहे. खेळाडू हा केंद्रबिंदू मानून सन १९९६ मध्ये सर्वप्रथम क्रीडा धोरण तयार करण्यात आले. या क्रीडा धोरणाचा कालावधी सन २००० पर्यंत निश्चित करण्यात आला होता.

- सन १९९६ मधील क्रीडा धोरणाची फलश्रुती व क्रीडा विकासाची दिशा लक्षत घेऊन नवीन क्रीडा धोरण सन २००१ मध्ये जाहिर करण्यात आले.

सन २००१ च्या क्रीडा धोरणात '**सर्वांसाठी खेळाव्दारे सदृढता**' हा केंद्रबिंदू ठरविण्यात आला असून आबालवृध्द नागरिकांमध्ये शारीरिक सुदृढता आणि याव्दारे आरोग्यसंपन्न कार्यक्षम जीवनाचे महत्व त्यांच्या मनावर बिंबविण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना या क्रीडा धोरणात सुचविण्यात आली आहे.

- राज्यचे क्रीडा धोरण ठरविण्यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. क्र.क्रीडाधो-२००६/प्र.क्र.१६७/०६/क्रीयुसे-१, दि.२० फेब्रु. २०१० अन्वये, मा.मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या समितीत ४५ सदस्यांचा अंतर्भाव होता.

क्रीडा धोरणांमधील ५८ महत्वपूर्ण शिफारसी केलेल्या आहेत. दि.२० एप्रिल,१२ रोजी शासनाने क्रीडा धोरण २०१२ मान्यता दिलेली होती.

- दि. १४ जुन २०१२ रोजी महाराष्ट्र राज्यचे क्रीडा धोरण २०१२ जाहीर झाले असून शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. त्या अनुषांगीक ८ योजनांचे शासन निर्णय प्राप्त झाले असून ते खालील प्रमाणे आहेत.

**१. राज्यातील आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू व त्यांचे क्रीडा मार्गदर्शक यांना रोख बक्षिस देवून गौरविण्याची योजना.**

राज्याचे क्रीडा धोरण २०१२ च्या अनुषंगाने शासन निर्णय क्र.राक्रीधो -२०१२/ प्र. क्र.१५८/ १२ / क्रीयुसे-२, दिनांक ५ फेब्रुवारी, २०१४ अन्वये राज्यतील आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू व त्यांचे क्रीडा मार्गदर्शक यांना रोख बक्षिस देवून गौरविण्याची योजना कार्यन्वित करण्यास शासनाने मान्यता व मंजूरी दिलेली आहे.

महाराष्ट्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक प्राप्त करणा-या खेळाडूंना तसेच त्यांचे क्रीडा मार्गदर्शक / प्रशिक्षक यांना रोख पारिताषिके देवून गौरव करण्याबाबत राज्यतील उल्लेखनिय कामगिरी करणा-या खेळाडूंना राज्यशासनातर्फे यापुर्वी वेळो-वेळी रोख पारितोषिके देवून गौरविण्यात आलेले आहे. तसेच राज्यतील आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनिय कामगिरी करुन राज्यचे नाव उज्वल केलेल्या राज्यतील खेळाडूंना व त्यांच्या र्मादर्शक / प्रशिक्षकांना, आलिंम्पिक, विश्व अजिंक्यपद, एशियनगेम्स, राष्ट्रकुल, युवा राष्ट्रकुल, एशियन चॅम्पियनशीप, युथ ऑलिम्पिक / ज्युनियर एशियन / विश्व, अजिंक्यपद स्पर्धा / शालेय आशियाई स्पर्धा, पॅरा आलिम्पिक स्पर्धा व पॅरा एशियन स्पर्धा या स्पर्धा करीता रोख रकमेचे पारितोषीक देवून गौरविण्यात येते.

**२. तालिम कुस्ती केंद्रचा विकास करण्याबाबत-**

राज्याचे क्रीडा धोरण २०१२ च्या अनुषंगाने शासन निर्णय क्र.राक्रीधो -२०१२/प्र. क्र.२४४ /१२/क्रीयुसे १, दिनांक १ मार्च, २०१४ अन्वये तालिम कुस्ती केंद्रचा विकास करण्याबाबत ही योजना कार्यन्वित करण्यास शासनाने मान्यता व मंजूरी दिलेली आहे.

महाराष्ट्रात कुस्ती कलेची परंपरा जोपासण्यासाठी तालिम व आखाड्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. कुस्तीच्या तंत्रात झालेले बदल लक्षत घेऊन आखाडा / तालमीचे आधुनिकीकरण करणे गरजेचे

असल्याची भावना राज्यतील कुस्ती पटूंनी वेळोवेळी व्यक्त केली आहे. जुन्या तालमींची दुरुस्ती / नुतनीकरण करण्यास अंदाजित खर्चाच्या ७५ टक्के किंवा कमाल रुपये ७.०० लक्ष या पैकी जी कमी असेल इतके अर्थसहाय्य ७५:२५ (शासन व संस्था) या प्रमाणात अनुदान स्वरुपात एकरकमी देण्यात येईल, असे प्रस्तावित आहे.

**३. क्रीडा शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन.**

राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन,प्रचार,प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण असणे आवश्यक आहे. याच भूमिकेतून राज्याचे क्रीडा धोरण २०१२ घोषित करण्यात आलेले आहे. या क्रीडा धोरणातील मुद्दा क्र ६ (५) नुसार खेळामधील बदललेले आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षणाच्या पध्दती, नवीन खेळ, खेळांची शास्त्रोक्त माहिती वेळोवेळी शिक्षकांना होणे आवश्यक आहे. तालूका,जिल्हा,विभाग व राज्यस्तरावर क्रीडा शिक्षकांच्या ज्ञानात भर पडावी व वेळोवेळी क्रीडा क्षेत्रात होणारे बदल अवगत होण्यासाठी राज्यतील शालेय शिक्षण विद्यार्थ्यांना योग्य क्रीडा प्रशिक्षण मिळण्यासाठी क्रीडा शिक्षकांचे अद्यायावत प्रशिक्षण असणे आवश्यक आहे. या करीता प्रति वर्षी १० दिवसांचे राज्यस्तरावर मास्टर्स ट्रेनर व जिल्हास्तरीय शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यासाठी अद्यावत क्रीडा धोरण सन २०१२ तयार करण्यात येऊन त्याच्या अंमलबजावणीसाठी शासन निर्णय क्र. क्रीडाधो-२०१२/प्र.क्र.२५०/ १२/ क्रीयुसे-२, दि. २८/०४/२०१४ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

**४. राज्यस्तरावर क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन.**

राज्याचे क्रीडा संस्कृतीचे संवर्धन,प्रचार,प्रसार व जोपासना करण्यासाठी व प्रतिभावंत खेळाडू तयार करण्यासाठी शासन अनेक वर्षापासून प्रयत्नशील आहे. सन १९९६ मध्ये राज्यचे स्वतंत्र क्रीडा धोरण जाहीर करण्यात आले. त्यानंतर सन २००१ मध्ये सुधारीत धोरण निश्चित करण्यात आले त्याचा परिणाम म्हणजे महाराष्ट्राचे क्रीडा क्षेत्रात नावलौकीक झाले. दरम्यानच्या काळात क्रीडा क्षेत्रात झालेले बदल लक्षत घेऊन व आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक विजेते खेळाडू तयार होण्यासाठी अद्यावत क्रीडा धोरण सन २०१२ तयार करण्यात येऊन त्याच्या आंमलबजावणी साठी शासन निर्णय क्र. क्रीडाधो-२०१२/प्र.क्र.२३१/क्रीयूसे-१, दि.१३/०२/२०१४ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. या शासन निर्णयन्वये पुरुष व महिला गटातील संबधित अधिकृत संघटनेचे खेळाडू तसेच शालेय १७ व १९ या वयोगटातील मुले व मुली खेळाडूंना सहभागी करुन घेण्यात येणार आहे.

**५. राज्यातील क्रीडा सुविधांचे सर्वेक्षण करणे.**

महाराष्ट्र राज्यचे क्रीडा धोरण - २०१२ च्या अनुषंगाने शासन निर्णय क्र.राक्रीधो-३११३/ प्र.क्र४६/ क्रीयुसे-३ दि.२६ फेब्रुवारी, २०१४ अन्वये, राज्यशासन, स्थानिक स्वराज्यसंस्था तसेच खाजगी संस्थामार्फत विकसित करण्यात आलेल्या क्रीडा सुविधांची माहिती संकलित करुन सर्वसामान्य जनतेस व खेळांडूंना उपलब्ध व्हावी तसेच जिथे क्रीडा सुविधा उपलब्ध नाहीत, तेथे नव्याने क्रीडा सुविधा उपलब्ध करणे या उद्देशाने क्रीडा विभागामार्फत सदर सुविधांचे सर्वेक्षण करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. यामध्ये जिल्हयातील स्थानिक स्वराज्यसंस्था, महसूल विभाग, शिक्षण विभाग, खाजगी संस्था यांचे सहकार्याने जिल्हानिहाय उपलब्ध सुविधांची माहिती संकलित करुन त्या माहितीच्या आधारे लोकप्रिय क्रीडा प्रकार, उपलब्ध सुविधा, खेळाडू संख्या, आवश्यकता इत्यादी बार्बीचा विचार करुन क्रीडा सुविधा विकसित करण्याकरिता आराखडा तयार करणे

## ६. माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविदयालयांना खेळांचे प्रचलनासाठी प्रोत्साहनात्मक अनुदान

क्रीडा धोरण, २०१२ च्या मधील शासन निर्णय क्र. राक्रीधो-२०१२/प्र.क्र.२५९/क्रीयुसे-१ दि. २६ फेब्रुवारी, २०१४ अन्वये तालुका, जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत जास्तीत जास्त शाळांच्या मुलां/मुलींचा सहभाग होण्याच्या दृष्टिकोनातून शाळांना प्रोत्साहनात्मक अनुदान मर्यादेत वाढ करण्याचा सुधारित निर्णय घेण्यात आलेला आहे.

क्रीडा विभागामार्फत तालुका, जिल्हा, विभाग, राज्यव राष्ट्रीय स्तर या क्रमाने शालेय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. या योजनेमध्ये जिल्हास्तर १४, १७, १९ वयोगटातील मुले व मुलींच्या जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेतील खेळ निहाय कामगिरीनुसार गुण प्रदान करण्यात येऊन त्यानुसार प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक दिले जातात. सदर शाळांना प्रोत्साहनात्मक अनुदान अनुक्रमे रु.१.०० लाख, रु.०.७५ लाख, ०.५० लाख दिले जातात. त्याचप्रमाणे राष्ट्रीय स्तर शालेय क्रीडा स्पर्धेत जास्तीत जास्त क्रीडा प्रकारात सहभागी होऊन पदक प्राप्त करणा-या राज्यतील सर्वोत्कृष्ट तीन शाळा रु.२.०० लक्ष, आणि आंतरराष्ट्रीय स्तर शालेय आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी होऊन प्रथम तीन क्रमांका पर्यत प्राविण्य मिळविणा-या खेळाडू विद्यार्थ्याच्या शाळेस रु.७.०० लाख व ४ ते १० क्र.पर्यतचे पदक विजेते खेळाडू तयार करणा-या शाळांना रु.३.०० लक्ष. दिले जाणार आहे. याप्रकारे प्राविण्य मिळविणा-या विद्यार्थ्याच्या शाळांना मंजूर झालेल्या अनुदानातून पुढील बाबींवर खर्च करणे बंधनकारक राहील, उदा. क्रीडांगणाची देखभाल व दुरुस्ती, क्रीडा साहित्याची खरेदी, क्रीडा वाड्मय पुस्तके, नियतकालिके यांची खरेदी, क्रीडाविषयक ध्वनीचित्रफितीची खरेदी, खेळाडूंचे प्रशिक्षण व प्रशिक्षकांचे मानधन, संबंधित खेळाडूंना गणवेश व रोख पारितोषिक इ.

## ७. क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी आर्थिक सहाय योजना –

राज्याचे क्रीडा धोरण २०१२, च्या अनुषंगाने शासन निर्णय क्र.राक्रीधो-२०१२/प्र.क्र.२६०/क्रीयुसे-१ दि.१ मार्च, २०१४ अन्वये क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य ही योजना कार्यान्वित करण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे.

सदर योजनेअंतर्गत अदयावत क्रीडा सुविधा निर्मिती व क्रीडा साहित्य अनुदान याकरिता खाजगी / शासनाच्या मार्फत चालविण्यात येणा-या व राज्यशासनाच्या संबंधित विभागाने दिलेल्या मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविदयालय, वरिष्ठ महाविदयालय, कृषी महाविदयालय, तंत्र शिक्षण व वैदयकीय महाविदयालय इत्यादी, स्थानिक स्वराज्यसंस्थेमार्फत चालविण्यात येणा-या प्राथमिक / माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविदयालय, विविध खेळांच्या विकासासाठी कार्यरत असणा-या सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० किंवा संस्था नोंदणी अधिनियम -१८६० अन्वये पंजीबध्द असतील अशा व्यायाम संस्था, क्रीडा मंडळे, एकविध खेळाच्या क्रीडा संघटना, युवा मंडळे व महिला मंडळे, स्थानिक स्वराज्यसंस्था, ग्रॅपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका, जिल्हा परिषद, आदिवासी विकास विभागामार्फत चालविण्यात येणा-या आश्रमशाळा, राज्यशासनाच्या वतीने विकसित करण्यात आलेली विभाग, जिल्हा, तालुका व ग्रॅ क्रीडा संकुले यांना ७५ : २५ शासन व संस्था हिस्सा या प्रमाणात अनुदान देण्यात येते.

## ८. शैक्षणिक संस्थाना मानधनावर क्रीडा मार्गदर्शक नियुक्तीस मान्यता देणेबाबत.

राज्याचे क्रीडा धोरण २०१२ च्या अनुषंगाने शासन निर्णय क्र. राक्रीधो-२०१२/प्र.क्र.१७९/१२/क्रीयुसे-२,दिनांक २८ एप्रिल २०१४ अन्वये शैक्षणिक संस्थानां मानधनावर क्रीडा मार्गदर्शक नियुक्तीस मान्यता देण्याबाबत हि योजना कार्यान्वीत करण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे.

शाळांमध्ये क्रीडा संस्कृती रुजविण्यासाठी शाळांच्या नियमित वेळापत्रका व्यतिरिक्त शाळा सुरु होण्यापूर्वी व शाळा सुटल्यानतंर सकाळी व संध्याकाळी तसेच सुटटीच्या कालावधी मध्ये क्रीडा प्रशिक्षण देण्यासाठी मानधन तत्वावर क्रीडा मार्गदर्शकांची नियुक्ती देऊन क्रीडा मार्गदर्शकानां रु.५०००/- दरमहा मानधन तत्वावर नियुक्ती देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

## ९. आंतरराष्ट्रीय खेळाडूनां प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, मार्गदर्शकांचे शुल्क इ.आर्थिक मदत करणे.

राज्याचे क्रीडा धोरण २०१२ च्या अनुषंगाने शासन निर्णय क्र. क्रीडाधो-३११३/प्र.क्र.२९/क्रीयुसे-३, दिनांक २८ एप्रिल २०१४ अन्वये अधिकृत आतंरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी तसेच सहभागी झालेल्या होतकरु खेळाडूनां प्रशिक्षण व इतर बाबींसाठी आर्थिक सहाय्य देण्याबाबत ही योजना कार्यान्वीत करण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे.

सदर योजनेतंर्गत अधिकृत आतंरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्या-या खेळाडूनां स्पर्धेत सहभागी होण्यासाठी १. प्रवास खर्च, प्रवेश शुल्क, निवास व भोजन २. देश विदेशातील स्पर्धापूर्व प्रशिक्षण, प्रशिक्षण उपकरणे, तज्ञ क्रीडा मार्गदर्शकांचे मार्गदर्शन शुल्क, प्रशिक्षण कार्यक्रम शुल्क. ३.आधुनिक क्रीडा साहित्य आयात/ खरेदी करणे, गणवेश इ. बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

## १०.क्रीडा शिक्षकानां प्रोत्साहित करण्यासाठी पुरस्कार देणे.

राज्याचे क्रीडा धोरण २०१२ च्या अनुषंगाने शासन निर्णय क्र. क्रीडाधो-३११३/प्र.क्र.३०/१३/क्रीयुसे-३, दिनांक २८ एप्रिल २०१४ अन्वये क्रीडा शिक्षकानां प्रोत्साहित करण्यासाठी पुरस्कार देण्याबाबत ही योजना कार्यान्वीत करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

सदर योजनेतंर्गत दिनांक १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या गत तीन वर्षाची कामगिरी विचारात घेण्यात येते. यामध्ये गुणवंत क्रीडा शिक्षकांसाठी एक महिला व एक पुरुष यांचा समावेश असून राज्यस्तरावर ८ विभागांसाठी १२ पुरस्कार दिले जातात. तसेच जिल्हास्तरावर ७० पुरस्कार दिले जातात. यात राज्यस्तर- गौरव, सन्मानचिन्ह व रोख रु.५०,०००/- जिल्हास्तर- गौरव,सन्मानचिन्ह व रोख रु.१०,०००/- याप्रमाणे पुरस्कार देण्यात येणार आहे.

## ११. शालेय क्रीडा स्पर्धा.

राज्याचे क्रीडा धोरण २०१२ च्या अनुषंगाने शासन निर्णय क्र.राक्रीधो-२०१२/प्र.क्र.१८२/क्रीयुसे २,दिनांक-२४ डिसेंबर २०१४ अन्वये शालेय क्रीडा स्पर्धा आयोजन करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. सदर योजनेतंर्गत तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तर तसेच भारतीय शालेय खेळ महासंघाव्दारे निवड होणा-या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. यात खेळाडूनां गणवेश,ट्रॅकसूट, हातखर्ची भत्ता, प्रवास खर्च, निवास व भोजन खर्च, अल्पोपहार भत्ता या बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

-------------

**मुंबई उपनगर जिल्ह्यातील  सन २०१८-१९ या वर्षामध्ये एकुण २१३ खेळाडुंना क्रीडा शिष्यवृत्ती देण्यात आली आहे. खेळनिहाय पुढीलप्रमाणे :-**

| अ.क्र. | खेळ | शिष्यवृत्ती धारक |
|---|---|---|
| १ | जलतरण | ३४ |
| २ | मैदानी | २७ |
| ३ | कबड्डी | ३ |
| ४ | खो खो | १ |
| ५ | ज्युदो | ४ |
| ६ | हॅण्डबॉल | ५ |
| ७ | हॉकी | ३ |
| ८ | सॉफ्टबॉल | ६ |
| ९ | व्हॉलीबॉल | १ |
| १० | कराटे | ५ |
| ११ | कुस्ती | ३ |
| १२ | रोलबॉल | १ |
| १३ | टेनिक्वाईट | १ |
| १४ | टेबल टेनिस | १० |
| १५ | डॉजबॉल | १ |
| १६ | तलवारबाजी | ३ |
| १७ | लॉन टेनिस | ७ |

| अ.क्र. | खेळ | शिष्यवृत्ती धारक |
|---|---|---|
| १८ | रग्बी | ४ |
| १९ | मल्लखांब | २ |
| २० | वेटलिफ्टींग | १ |
| २१ | सिकई मार्शल आर्ट | ४ |
| २२ | बुद्धिबळ | ४ |
| २३ | बास्केटबॉल | ७ |
| २४ | कॅरम | ६ |
| २५ | फुटबॉल | ४ |
| २६ | थ्रोबॉल | २ |
| २७ | वुशू | ३ |
| २८ | सायकलिंग ट्रॅक | ८ |
| २९ | तायक्वांदो | ३ |
| ३० | जिम्नॅस्टिक्स | ३२ |
| ३१ | स्केटींग | ९ |
| ३२ | नेटबॉल | ५ |
| ३३ | पीप साईट राय. | २ |
| ३४ | बॅडमिंटन | २ |

# शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त
# उत्कृष्ट खेळाडू, मार्गदर्शक, संघटक / कार्यकर्ता
# सन २०१७-१८ मधील मुंबई उपनगर जिल्ह्यातील मानकरी

| अ.क्र. | पुरस्कार्थींची नावे | अ.क्र. | पुरस्कार्थींची नावे |
|---|---|---|---|
| १. | श्री. सनिल शंकर शेट्टी<br>(खेळाडू - टेबल टेनिस ) | ८. | श्री. सिध्दार्थ थिंगलिया<br>(खेळाडू - ॲथलेटिक्स ) |
| २. | श्री. अनिकेत भगवान पोटे<br>(खेळाडू - खो-खो ) | ९. | श्री. सागर ओव्हळकर<br>(खेळाडू - मल्लखांब ) |
| ३. | श्री. सुरज करकेरा<br>(खेळाडू - हॉकी) | १०. | श्री. सागर सावंत<br>(खेळाडू - आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक ) |
| ४. | श्री. मनोज मोरे<br>(खेळाडू - पॉवरलिफ़्टींग) | ११. | श्री. महेश माणगावकर<br>(खेळाडू - स्क्वॅश ) |
| ५. | श्री. ध्रुव सित्वाला<br>(खेळाडु - बिलीयर्डस व स्नुकर ) | १२. | श्रीमती .मानसी जोशी<br>(एकलव्य दिव्यांग खेळाडू - बॅडमिंटन ) |
| ६. | श्री. सिध्दार्थ पारेख<br>(खेळाडु - बिलीयर्डस व स्नुकर ) | १३. | श्री. मार्क धमाई<br>(एकलव्य दिव्यांग खेळाडू - बॅडमिंटन ) |
| ७. | श्रीमती. भाग्यश्री पुरोहित<br>(खेळाडू - बॉक्सींग) | १४. | श्री. सत्यप्रकाश तिवारी<br>(क्रीडा मार्गदर्शक - बॅडमिंटन ) |

जिल्हा क्रीडा पुस्कार प्राप्त उत्कृष्ट खेळाडू, मार्गदर्शक, संघटक / कार्यकर्ता

सन २०१६-१७ व २०१७-१८ मधील मुंबई उपनगर जिल्ह्यातील मानकरी

| अ.क्र | पुरस्कार्थींची नावे | अ.क्र | पुरस्कार्थींची नावे |
|---|---|---|---|
| १. | श्री. अनस अली शेख<br>(खेळाडु -जिम्नॅस्टिक) | ६. | सागर दरशथ सावंत<br>(खेळाडु-आर्टि. जिम्नॅस्टिक) |
| २. | श्रीमती .वैदेही अभय देऊलकर<br>(खेळाडु -जिम्नॅस्टिक) | ७. | श्रीमती.रुतुजा दत्तात्रय जगदाळे<br>(खेळाडु-एक्रो. जिम्नॅस्टिक) |
| ३. | श्री. पार्थ किशोर हेंद्रे<br>(दिव्यांग खेळाडु - जलतरण) | ८. | श्री. सागर सावंत<br>(खेळाडू - आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक ) |
| ४. | श्रीमती .प्रज्ञा परशुराम चव्हाण(क्रीडा मार्गदर्शक) | ९. | सायली उदय जाधव<br>(खेळाडू -कबड्डी) थेट पुस्कार |
| ५. | आकाश फुला पाटील(क्रीडा मार्गदर्शक) | १०. | सुरेशकुमार ना.समेळ.(कार्य / संघटक) |

